# महाराष्ट्र विधानपरिषद

## पाचवे अधिवेशन, २०१६

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**मंगळवार, दिनांक ०६ डिसेंबर, २०१६ / अग्रहायण १५, १९३८ ( शके )**

**(१) वित्त आणि नियोजन, वने, मंत्री**
**(२) ग्रामविकास, महिला व बाल कल्याण मंत्री**
**(३) वैद्यकीय शिक्षण, जलसंपदा व लाभक्षेत्र विकास मंत्री**
**(४) सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री**
**(५) जलसंधारण, राजशिष्टाचार मंत्री**
**(६) रोजगार हमी योजना, पर्यटन मंत्री**

**} यांचे प्रभारी विभाग**

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ८७**

---

### पुणे जिल्ह्यातील टेमघर धरणाचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत

**(१) * २५६२० डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील टेमघर धरणाच्या बांधकामासाठी दिलेला निधी संपूर्णपणे बांधकामाला न वापरता धरणाच्या कामात गुणवत्ता न राखता निकृष्ट दर्जाचे बांधकाम करुन खोटे दस्तऐवज तयार करुन शासनाच्या निधीचा अपहार केला असल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच टेमघर धरणाचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे झाल्याप्रकरणी चौकशी करण्यासाठी नेमलेल्या रानडे समितीने दिनांक ३० जून, २०१६ रोजी शासनास सादर केलेल्या अहवालात श्रीनिवास कन्स्ट्रक्शन, प्रोगेसिव्ह कन्स्ट्रक्शन या कंपन्यांच्या संचालकांसह ३४ जणांना दोषी ठरविण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त अहवालातील दोषी व्यक्तीवर कोणकोणत्या कलमांखाली गुन्हा नोंदविण्यात आला आहे,

(४) असल्यास, सदर प्रकरणातील दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) अंशत: खरे आहे.

धरणाचे कामात गुणवत्ता न राखता निकृष्ट दर्जाचे बांधकाम झाले आहे हे खरे आहे. तथापि खोटे दस्तऐवज करुन शासन निधीच्या अपहाराबाबतचे प्रकरण अन्वेषणाधीन आहे.

(२) अंशत: खरे आहे.

रानडे समितीने दिनांक ३० जून, २०१६ रोजी शासनास सादर केलेल्या अहवालात धरणाचे कमी प्रतिचे कामास संबंधित कंत्राटदार व कामावर पर्यवेक्षण करणारे जबाबदार असल्याचे नमूद करण्यात आले आहे. त्या अनुषंगाने शासनाने २५ पर्यवेक्षीय अधिकारी व कंत्राटदार कंपनीचे ९ संचालक अशा ३४ जणांविरुध्द तक्रार पौड पोलीस स्टेशनमध्ये केली आहे.

(३) भारतीय दंड विधानातील कलम ४०६, ४०९, ४६७, ४६८, ४७१, ४२०,१२० ब या कलमांखाली गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

(४) दोषी अधिकाऱ्यांवर विभागांतर्गत चौकशी प्रस्तावित करण्यात आली आहे. तसेच पौड, पोलीस स्टेशन, ता. मुळशी येथे दिनांक १८/०८/२०१६ रोजी संबंधित अभियंते व कंत्राटदार यांच्याविरुध्द तक्रार (F.I.R. क्र. २१४/२०१६) दाखल करण्यात आली आहे. तसेच शासन आदेश क्र. संकिर्ण-२०१६/८११/(१८६/२०१६)/दक्षता-१ दिनांक ०३/०९/२०१६ अन्वये संबंधित सेवेतील अभियंता यांना सेवेतून निलंबित करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे संबंधित कंत्राटदारास काळ्या यादीत टाकण्याबाबत कार्यवाही सुरु करण्यात आली आहे.

-----------------

**राज्यातील येरवडा मनोरुग्णालय व ठाणे मनोरुग्णालयांमधील**
**महिला रुग्णांची स्थिती गंभीर असल्याबाबत**

**(२) * २३४९७ श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती विद्या चव्हाण, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.अनिल भोसले, श्री.जयवंतराव जाधव, श्री.ख्वाजा बेग, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.सुनिल तटकरे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय महिला आयोग आणि नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ मेंटल हेल्थ ॲण्ड न्यूरोसायन्सेस या संस्थांनी २०१५-१६ मध्ये देशभरातील निवडक दहा शासकीय मनोरुग्णालयांचा अभ्यास करुन महिला मनोरुग्णालयांच्या परिस्थितीवर एक अहवाल तयार करुन, सर्व राज्यांचे आरोग्य सचिव तसेच प्रमुख आरोग्य अधिकाऱ्यांच्या दिल्ली येथे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये भरलेल्या परिषदेत अहवाल तसेच उपाययोजनांची माहिती दिली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अहवालात महाराष्ट्रातील येरवडा मनोरुग्णालय तसेच ठाणे मनोरुग्णालयांमधील महिला रुग्णांची स्थिती गंभीर असल्याचे नमूद करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या अहवालाचे अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने महिला मनोरुग्णांसाठी सुविधा देण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

येरवडा, पुणे येथील प्रादेशिक मनोरुग्णालयाची राष्ट्रीय महिला आयोगाने सविस्तर पाहणी केली आहे. तसेच सदर रुग्णालयातील रुग्णांसाठी काही उपाययोजना व सुधारणा सुचविल्या आहेत. तथापि तेथील महिला रुग्णांची स्थिती गंभीर असल्याबाबत राष्ट्रीय महिला आयोगाच्या पत्रात नमूद करण्यात आलेले नाही.

(३) अहवालातील नमूद त्रुटींच्या अनुषंगाने तपासणी करण्यात येत असून प्रादेशिक मनोरुग्णालय, पुणे येथील रिक्त पदे भरणे, इमारतीच्या बांधकामाबाबतची कार्यवाही प्रगती पथावर आहे. सदर मनोरुग्णालयात स्त्री

रुग्णांना त्यांच्या आवश्यकतेनुसार आरोग्यविषयक सुविधा उपलब्ध करुन देणे, रुग्णांच्या मनोरंजनाची व्यवस्था करणे, विविध सण साजरे करणे, मनोरुग्णालयातील अधिकारी/कर्मचारी यांचे प्रशिक्षण घेणे, व्यावसायिक प्रशिक्षणाच्या माध्यमातून रुग्णांचे पुनर्वसन करणे इ. बाबी पार पाडल्या जातात. सदर रुग्णालयात व्यवसाय उपचार केंद्राच्या माध्यमातून महिला व्यवसायोपचार तज्ञांच्या मदतीने महिला रुग्णांकडून विविध कलाकौशल्याचे साहित्य तयार करुन घेणे त्याची विक्री करणे या प्रक्रियाही पार पाडल्या जातात.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**रुग्णवाहिकेची सुविधा खासगी रुग्णालयासाठी उपलब्ध करण्याबाबत**

**(३) * २६१०६ श्रीमती हुस्नबानू खलिफे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील रुग्णांना तातडीने वैद्यकीय सेवा देण्यासाठी आरोग्य विभागाने सुरु केलेली क्र.१०८ रुग्णवाहिका सेवा रुग्णांना फक्त शासकीय रुग्णालयात नेण्यासाठीच वापरण्यात येते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य मानवी हक्क आयोगाने क्र.१०८ रुग्णवाहिका सेवेकडून खासगी रुग्णालयात नेण्यास नकार देण्यामागील खुलासा मागितल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रुग्णांना खासगी रुग्णालयात न नेण्यामागील कारणे काय याबाबत राज्याच्या आरोग्य विभागाने राज्य मानवी हक्क आयोगाला केलेल्या खुलाशाबाबतचा संपूर्ण तपशील काय आहे,

(४) असल्यास, क्र.१०८ रुग्णवाहिका सेवा रुग्णांना खासगी रुग्णालयात नेण्यात यावी याबाबत शासनस्तरावरुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे आहे. तथापि, आपत्कालीन वैद्यकीय परिस्थितीत रुग्णाचे प्राण वाचविण्याच्या दृष्टीकोनातून संबंधित रुग्णालये, नातेवाईक व संबंधित जिल्ह्याचे जिल्हा शल्य चिकित्सक व जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्या संमतीने रुग्णास जवळ उपलब्ध असलेल्या खाजगी रुग्णालयात अशा रुग्णवाहिकेमार्फत नेता येते.

(२) नाही, असे निदर्शनास आलेले नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

**मौजे झोरेवाडी (ता.संगमेश्वर, जि.रत्नागिरी) या गावास स्मशानभूमीकडे जाण्यासाठी रस्ता व स्मशानभूमीला शेड बांधून देण्याबाबत**

**(४) * २४८४९ श्रीमती विद्या चव्हाण, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे झोरेवाडी (ता.संगमेश्वर, जि.रत्नागिरी) या गावांस स्मशानभूमीकडे जाण्यासाठी रस्ता व स्मशानभूमीत शेड बांधून देण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी व नागरिकांनी शासनाकडे दिनांक १ मार्च, २०१६ रोजी आणि माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान करुनही सदर रस्ता व शेड बांधून देण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) मौजे झोरेवाडी (ता.संगमेश्वर, जि.रत्नागिरी) येथे स्मशानशेड बांधणे या कामाची निवड सन २०१६-१७ च्या निवडसुचीमध्ये करण्यात आली असून स्मशानशेडकडे जाणारा रस्ता करणे या कामाचा समावेश सन २०१७-१८ च्या जनसुविधा अंतर्गत घेण्यात येणाऱ्या कामांच्या आराखड्यामध्ये करुन नियोजन समितीमार्फत प्राप्त होणाऱ्या निधी उपलब्धतेनुसार सदर काम पुर्ण करण्याची कार्यवाही जिल्हा परिषद, रत्नागिरी यांच्यामार्फत करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**अंगणवाडीतील सेविका आणि मदतनीसांचे मानधन वाढीकरिता समिती नेमण्याबाबत**

**(५) * २५५१० श्री.रामराव वडकुते, श्री.सतिश चव्हाण, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.अनिल भोसले, श्री.ख्वाजा बेग, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.हेमंत टकले, श्री.आनंद ठाकूर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.कपिल पाटील, श्रीमती स्मिता वाघ, श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्ह्यासह राज्यातील अंगणवाडी सेविका व मदतनीसांच्या अनेक प्रलंबित मागण्यांच्या अंमलबजावणीसाठी माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान आंदोलन करून शासनाने लक्ष वेधले होते, हे खरे आहे काय,

(२) तसेच राज्यातील अंगणवाडी सेविका, मिनी अंगणवाडी सेविका व मदतनीसांना केरळ आणि पुदुच्चेरी या राज्यांच्या धर्तीवर किमान मानधन मिळणेबाबतचा प्रस्ताव व अंगणवाडी सेविका, मदतनीस व मिनी अंगणवाडी कार्यकर्ती यांच्या मानधनात व भाऊबीज भेटीत वाढ करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच शासनाने अंगणवाडीतील सेविका आणि मदतनीसांचे मानधन वाढीकरीता समिती नेमली आहे, या समितीने आपला अहवाल शासनास सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२), (३) व (४) अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या मानधनामध्ये दरवर्षी वेतनवाढीप्रमाणे वाढ करण्याकरिता दिनांक २०/०७/२०१६ च्या शासन निर्णयान्वये समिती गठित करण्यात आली असून समितीच्या दोन बैठका झालेल्या आहेत. पुढील कार्यवाही सुरु आहे.

-----------------

**मानखुर्द, मुंबई येथील चिल्ड्रन होमची दुरुस्ती करण्याबाबत**

**(६) * २३५१९ श्री.नरेंद्र पाटील, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.जयवंतराव जाधव, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.अमरसिंह पंडित, ॲड.निरंजन डावखरे, श्री.आनंद ठाकूर, श्री.रामराव वडकुते, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मानखुर्द, मुंबई येथील चिल्ड्रन होममध्ये पावसाळयात पाण्याची गळती होत असल्याने सदर चिल्ड्रन होमची दुरुस्ती करण्याचे निर्देश मा.मुंबई उच्च न्यायालयाने शासनास माहे ऑगस्ट, २०१६ च्या पहिल्या सप्ताहात दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार शासनाने दुरुस्तीबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) होय.

(२) सदर इमारतीच्या दुरुस्तीबाबत आयुक्त, अपंग कल्याण, पुणे यांनी दिनांक १८/८/२०१६ च्या पत्रान्वये कार्यकारी अभियंता (उत्तर मुंबई) सार्वजनिक बांधकाम विभाग यांना दुरुस्तीचे काम पूर्ण करण्याबाबत कळविलेले आहे. तसेच मा.मंत्री (सा.न्या.) यांनी दिनांक २५/१०/२०१६ रोजी बैठक घेऊन सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना इमारत दुरुस्तीबाबत निर्देश दिलेले आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील आदिवासी भागात बालमृत्यूच्या प्रमाणात तसेच कुपोषित बालकांच्या संख्येत वाढ झाल्याबाबत**

**(७) * २४०४७ ॲड.अनिल परब :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आदिवासी भागात बालमृत्यूच्या प्रमाणात तसेच कुपोषित बालकांच्या संख्येत मोठया प्रमाणात वाढ झाल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सार्वजनिक आरोग्य विभाग आणि महिला व बालकल्याण विभागाच्या माध्यमातून ० ते ६ वयोगटातील कमी वजनाच्या व तीव्र कमी वजनाच्या बालकांच्या संख्येत फरक आढळला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त दोन्ही विभागामार्फत कमी (मॅम) व तीव्र कमी वजनाची (सॅम) नोंद करण्याचे निकषच विसंगत असल्यामुळे या दोन्ही विभागात समन्वयाचा अभाव असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, तद्नुसार यास जबाबदार असणाऱ्या व्यक्तीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) अंशत: खरे आहे.

राज्यातील आदिवासी भागात गेल्या दहा वर्षाच्या आकडेवारी वरुन दरवर्षी बालमृत्यूच्या प्रमाणात घट होत आहे. मात्र कुपोषित बालकांच्या संख्येत सप्टेंबर, २०१५ च्या तुलनेत सप्टेंबर, २०१६ रोजीच्या आकडेवारीनुसार ०.२१% ने वाढ झाली असल्याचे दिसते.

(२) व (३) कुपोषित बालकांची वर्गवारी व महिला व बाल विकास विभागाच्या "वयानुसार वजन" या निकषानुसार ठरविण्यात येते. आरोग्य विभागामार्फत कुपोषित बालकांच्या उपचाराची कार्यवाही करण्यात येत असल्यामुळे उंचीनुसार वजन, दंडघेर व पायावर सूज हे निकष वापरण्यात येतात व त्यानुसार दोन्ही विभागाकडून आकडेवारी निश्चित होते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात विशेषत: पुणे व मुंबई येथे साथींचे आजार वाढ झाल्याबाबत**

**(८) * २३६३१ श्री.नारायण राणे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.सुनिल तटकरे, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.अनिल भोसले, श्री.जयवंतराव जाधव, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.धनंजय मुंडे, श्री.आनंद ठाकूर, श्री.ख्वाजा बेग, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.संजय दत्त, श्रीमती विद्या चव्हाण, ॲड.निरंजन डावखरे, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.प्रकाश गजभिये, श्री.रामराव वडकुते, श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: मुंबई शहर व उपनगरासह ताप, मलेरिया, डेंग्यू, लेप्टो, गॅस्ट्रो, काविळ व चिकनगुनिया या साथींच्या रोगाची लागण झालेल्या रुग्णांची संख्या वाढत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच, माहे जानेवारी, २०१६ पासून राज्यात डेंग्यूचे १०६ रुग्ण, लेप्टोचे ५३ आणि मलेरियाचे १०१० रुग्ण आढळले तसेच या साथींची ३ हजार लोकांना लागण होऊन जुलै, २०१६ ते ऑक्टोबर, २०१६ च्या दरम्यान ५ जणांचा मृत्यू झाला, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच पुणे शहरात माहे जानेवारी, २०१६ पासून डेंग्यूचे संशयित ६८८ रुग्ण आणि जुलै, २०१६ या महिन्यात सर्वाधिक २९५ संशयित रुग्ण आढळल्याचे तसेच राज्यात २५८२ रुग्णांची वाढ झाल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(४) तसेच सदर साथ पुणे कॅन्टोमेंट बोर्डाच्या परिसरात पसरल्याने रुग्णांना दाखल करण्यास रुग्णालये कमी पडत आहेत, हे खरे आहे काय,
(५) असल्यास, मुंबई, पुणे सह राज्यात साथीच्या आजाराला आळा घालण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे अंशत: खरे आहे.

दरवर्षी जलजन्य तसेच किटकजन्य आजारांचे प्रमाण पावसाळयात वाढताना दिसते. तथापी, ऑक्टोबर पासून साथरोगाचे प्रमाण कमी होताना आढळते. सन २०१६ मध्येही राज्यात चिकुनगुनिया व लेप्टोस्पायरोसिस आजार वगळता इतर आजारांचे प्रमाण ऑक्टोबर महिन्यात कमी होताना निदर्शनास येत आहे.

(२) होय, हे खरे आहे.

जानेवारी, २०१६ पासून ऑक्टोबर, २०१६ अखेर राज्यात डेंग्यूचे ६५५३, लेप्टोचे ३१४ आणि मलेरियाचे २०२५१ रुग्ण आढळले असून डेंग्यूमुळे २२, लेप्टोमुळे ११ तर मलेरियामुळे १८ जणांचा मृत्यू झाला आहे.

(३) हे खरे आहे.

पुणे शहरात माहे जानेवारी, २०१६ पासून ऑक्टोबर, २०१६ अखेर डेंग्यूचे ५९६ रुग्ण आढळून आले असून जुलै महिन्यात या आजाराचे २७८ संशयीत रुग्ण निदर्शनास आले आहेत. तसेच या रोगाचा प्रादूर्भाव ठरावीक क्षेत्रात होत असल्याचे निदर्शनास आले आहे.

ऑक्टोबर, २०१६ अखेर डेंग्यू रुग्ण संख्येत गतवर्षीच्या तूलनेत २१९२ ने वाढ झाल्याचे निदर्शनास आले आहे.

(४) हे खरे नाही.

पुणे कॅन्टोन्मेंट क्षेत्रात डेंग्यूचे ८६ रुग्ण आढळले असून त्यापैकी ४० रुग्णांनी कॅन्टोन्मेंटच्या सरदार वल्लभभाई पटेल रुग्णालयात उपचार घेतले आहेत तर उर्वरित रुग्णांनी खाजगी रुग्णालयात उपचार घेतलेले आहेत. चिकुनगुनियाच्या एकुण ९९ रुग्णांपैकी ९३ रुग्णांना कॅन्टोन्मेंटच्या रुग्णालयात उपचार देण्यात आलेले आहेत.

(५) राज्यात साथीच्या आजाराला आळा घालण्यासाठी सर्व आवश्यक त्या उपाययोजना नियमितपणे राबविल्या जातात.

-----------------

**सेवानिवृत्त कर्मचारी आणि सेवानिवृत्त शिक्षक यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या मतीमंद व अती विकलांग मुलांना निवृत्तीवेतन देण्याबाबत**

**(९) * २५६७१ श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय, निमशासकीय सेवा यातील सेवानिवृत्त कर्मचारी आणि सेवानिवृत्त शिक्षक यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या मतीमंद व अती विकलांग मुलांना निवृत्तीवेतन देण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याचे स्वरुप काय आहे, याबाबत शासनाची भूमिका व कार्यवाही काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) ज्या कर्मचाऱ्यांना म.ना.से (निवृत्तीवेतन) नियम १९८२ च्या तरतूदी लागू आहेत असे सर्व राज्य शासकीय कर्मचारी, जिल्हा परिषद कर्मचारी व कृषि व कृषितर अनुदानित शैक्षणिक संस्थांतील कर्मचाऱ्यांच्या व त्यांच्या पत्नी/पतीच्या मृत्यूनंतर म.ना.से (निवृत्तीवेतन) नियम १९८२ मधील नियम ११६(५)(तीन) च्या परंतुकानुसार मानसिक दुर्बलता/शारीरिक विकंलगता असलेल्या अपत्यास कुटुंबनिवृत्तीवेतन अनुज्ञेय आहे

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नागपूर पोलीस रुग्णालयातील डॉक्टरांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(१०) * २४४५३ श्री.प्रकाश गजभिये :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरात साडेसात हजार पेक्षा जास्त पोलीस कर्मचारी असून त्यांच्यासाठी केवळ तीन डॉक्टर असल्यामुळे पोलीस कर्मचाऱ्यांना पुरेश्या प्रमाणात आरोग्यसेवा मिळत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पोलीस रुग्णालयात अनेक यंत्र नादुरुस्त आहे व फक्त तीन डॉक्टर आहेत, त्यामुळे लाखो रुपयांची एक्स-रे मशीन वापराविनाच असल्याने पोलीस कर्मचारी व त्यांच्या कुटुंबियांना खाजगी व शासकीय रुग्णालयात जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पोलीस रुग्णालयातील रिक्त पदे भरण्यासाठी व यंत्रसामुग्रींची दुरुस्ती करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) पोलीस रुग्णालय नागपूर शहर येथे शासनाकडून तीन वैद्यकीय आधिकार (गट अ-एक व गट ब-दोन) नियुक्त केलेले आहे. त्याचप्रमाणे येथे खालीलप्रमाणे मानसेवी तज्ञ वैद्यकीय अधिकारी सेवा देतात.

१. स्त्रीरोग तज्ञ २
२. बाल रोग तज्ञ २
३. अस्थिरोग तज्ञ १
४. फिजीशीअन १
५. नेत्र तज्ञ १
६. दंत रोग तज्ञ १
७. कान, नाक घसा, तज्ञ १
८. जनरल सर्जन १

तसेच महाराष्ट्र पोलीस कुटुंब आरोग्य योजनेंतर्गत नागपूर येथे २० खाजगी रुग्णालय पॅनलवर आहेत. या ठिकाणी देखील रुग्णांना संदर्भ सेवा देण्यात येते. अशा प्रकारे रुग्णालयात येणाऱ्या रुग्णांना गरजेप्रमाणे योग्य प्रकारे आरोग्य सेवा दिली जाते.

(२) पोलीस रुग्णालय, नागपूर मधील एक्स-रे मशीन कार्यान्वित नाही, ही वस्तुस्थिती आहे. तसेच येथे आता नव्याने डिजीटल एक्स-रे मशिन उपलब्ध करण्याची कार्यवाही सुरु आहे. सध्यास्थितीत एक्स-रे करीता रुग्णांना शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर व इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर येथे संदर्भ सेवा देण्यात येते.
(३) पोलीस रुग्णालय, नागपूर शहर येथील पोलीस विभागातर्फे लवकरच पॉलीक्लिनिक सेवा सुरु करण्यात येत आहे. त्यासाठी आवश्यक यंत्रसामुग्री उपलब्ध करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सार्वजनिक आरोग्य विभागात कर्मचाऱ्यांची भरती प्रक्रिया सक्रियतेने पार पाडण्याकरीता घ्यावयाचा निर्णय

**(११) * २५६४७ श्री.अनिल भोसले, श्री.जयवंतराव जाधव, श्री.ख्वाजा बेग, श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सार्वजनिक आरोग्य विभागात दिनांक १ ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्यासुमारास कर्मचाऱ्यांच्या भरतीची प्रक्रिया राबविण्यासाठी पोलिसांत गुन्हा दाखल असलेल्या कंपनीला कंत्राट देण्यात येऊ नये अशा स्वरुपाची मागणी लोकप्रतिनिधींनी दिनांक १३ जुलै, २०१६ रोजी वा त्यासुमारास प्रधान सचिवांकडे लेखी स्वरुपात केल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रधान सचिवांना लिहिलेल्या लेखी पत्रामध्ये लोकप्रतिनिधी यांनी केलेल्या मागण्या कोणत्या आहेत,

(३) सार्वजनिक आरोग्य विभागात कर्मचाऱ्यांची भरती प्रक्रिया पार पाडण्याकरीता २१ व २८ ऑगस्ट असे दोन दिवस लेखी परीक्षा प्रक्रिया पार पाडण्याकरीता शासनाने मागविलेल्या निविदांमध्ये किती व कोणकोणत्या कंपन्यांनी सहभाग घेतला होता, त्यापैकी कोणत्या संस्था व कंपनीला हे काम देण्याचा निर्णय घेण्यात आला,

(४) असल्यास, लोकप्रतिनिधी यांनी ज्या कंपनीला काम देण्यात येऊ नये अशी लेखी मागणी केली होती, त्या कंपनीला काम देण्यात आले होते काय, त्या कंपनी विरोधात सन २००८ मध्ये गैरव्यवहार केल्याबद्दल पुणे येथील पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला होता याची माहिती सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अधिकाऱ्यांना असूनही अशा दोषी कंपनीला कर्मचारी भरती प्रक्रिया पार पाडण्याचे काम देण्याचा निर्णय घेण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे आहे.

(२) मा.प्रधान सचिवांना लिहिलेल्या पत्रामध्ये लोकप्रतिनिधी यांनी कुणाल आयटी या कंपनीवर गुन्हा दाखल असल्यामुळे कंपनीची चौकशी करुन दिलेले काम रद्द करुन सेकंड लोवेस्ट आयटी कंपनीकडून पुन्हा निविदा बोलविण्यात यावी, अशा मागण्या केलेल्या आहेत.

(३) शासनाने मागविलेल्या निविदांमध्ये

१. मे.कुणाल आयटी सर्विसेस प्रा.लि.

२. मे.इ.टी.एस.लिमिटेड

३. मे.ओएमआर टेक्निकल सोल्युशन्स

४. मे.एक्झॉन ऑटोमेशन प्रा.लि.

५. मे.ओएमआर इंडिया ऑऊट सोर्सेस प्रा.लि.

६. मे.देवहर्ष इन्फोटेक प्रा.लि.

या कंपन्यांनी सहभाग घेतला होता, केंद्रीय खरेदी समिती बैठक दिनांक १५/०७/२०१६ मधील निर्णयानुसार मे.कुणाल आयटी सर्व्हिसेस, पुणे यांची निविदा अपात्र ठरविण्यात आली असून उर्वरित कंपन्यापैकी कोणत्याही कंपनीस काम देण्याचा निर्णय घेण्यात आलेला नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**रायगड जिल्हयातील रायगड किल्ला जतन संवर्धनाच्या**
**मंजूर आराखड्याच्या अंमलबजावणीबाबत**

**(१२) * २३५४८ श्री.किरण पावसकर, अॅड.निरंजन डावखरे, श्री.नरेंद्र पाटील, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्हयातील रायगड किल्ला जतन संवर्धनाचा रुपये ५२० कोटींचा आराखडा जिल्हास्तरीय समितीत मंजूर करण्यात आला असून तो मुख्य सचिवांच्या समितीपुढे पाठविण्यात येणार असल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या विकास आराखड्याचे सर्वसाधारण स्वरुप काय आहे, शासनाने या आराखड्याला मुख्य सचिवांच्या समितीकडून मंजूरी घेवून त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल :** (१) होय.

(२) रायगड किल्ल्याच्या विकास आराखड्यामध्ये रायगड किल्ला व परिसराच्या विकास कामांचा समावेश आहे. सदर आराखडा मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील उच्चाधिकारी समितीसमोर ठेवण्याकरीता सादर करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**इंदिरा गांधी वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर येथे कॉर्निया ट्रान्सप्लांट सेंटरला मान्यता देण्याबाबत**

**(१३) * २५२१३ प्रा.अनिल सोले, श्री.मितेश भांगडिया :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इंदिरा गांधी वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर येथे अंधांना दृष्टी देण्यासाठी Cornea Transplant Centre ला मान्यता मिळाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनातर्फे मान्यता दिली असल्यास आजपर्यंत किती अंधांना दृष्टी देण्यासाठी Cornea Transplant Centre करण्यात आल्या आहेत,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन जबाबदार तज्ञांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) हे खरे आहे.

(२) इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर या संस्थेमध्ये नेत्रशल्यचिकित्सा विभागांतर्गत सन २००७ ते २०१२ पर्यंत संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई यांच्या अधिनस्त Zonal Transplant Centre ची मान्यता प्राप्त होती. सदर कालावधी दरम्यान रुग्णालयामध्ये २२ Cornea Transplant शस्त्रक्रिया करण्यात आल्या आहेत.

संस्थेस नेत्र प्रत्यारोपणाकरिता दिनांक २८/९/२०१६ नुसार नुतनीकरण प्राप्त झाले असून, अद्यापपर्यंत मरणोत्तर नेत्रदान बुब्बुळे प्राप्त झालेली नाहीत. मरणोत्तर बुब्बुळे प्राप्त होताच Cornea Transplant शस्त्रक्रिया करण्यात येतील.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**सोलापूर जिल्हयात अतिकुपोषित व कुपोषित बालकांची संख्या वाढल्याबाबत**

**(१४) * २३९११ श्री.प्रशांत परिचारक :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्हयात ६४ अतिकुपोषित व ५६३ कुपोषित बालकांची संख्या असल्याचे दिनांक १९ सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महिला व बालकल्याण विभागांतर्गत एकात्मिक बालविकास प्रकल्प कार्यालये कुपोषित बालकांची आकडेवारी कमी दाखवून जिल्हा कुपोषण मुक्त झाल्याची खोटी माहिती देत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील कुपोषित बालके सुदृढ करण्याकरिता राज्य शासन, केंद्र शासन व जिल्हा परिषदेच्या सेस फंडातून पुरक पोषण आहारासाठी भरघोस निधी दिला जातो, परंतु हा निधी कुपोषितांपर्यंत पोहचत नसल्याचे आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन निधीचा अपव्यय करणाऱ्या व शासनाची दिशाभूल करणाऱ्या संबंधित कार्यालयातील कर्मचारी व अधिकारी यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) सोलापूर जिल्हयात माहे सप्टेंबर, २०१६ अखेर मध्यम कमी वजनाची (MAM)-५२२ बालके व तीव्र कमी वजनाची (SAM)-५७ बालके असल्याचे आढळून आले आहे.

तथापि, मागील तीन वर्षातील कुपोषणाची श्रेणीनिहाय आकडेवारी पाहता मध्यम कमी वजन व तीव्र कमी वजनाच्या बालकांच्या संख्येत घट झालेली आहे.

(२) व (३) एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत सर्वसाधारण श्रेणीतील बालकांना दररोज (५०० उष्मांक आणि १२ ते १५ ग्रॅम प्रथिने असलेला) आहार देण्यात येतो. त्याचप्रमाणे तीव्र कमी वजनाच्या बालकांना दररोज (८०० उष्मांक आणि २० ते २५ ग्रॅम प्रथिने असलेला) आहार देण्यात येतो.

तसेच ग्राम स्तरावरील ग्राम आरोग्य व पोषण समिती निधीतून अंगणवाडीतील ३ ते ६ वर्ष वयोगटातील कुपोषित बालकांना अतिरिक्त आहार उदा.गूळ शेंगदाणा लाडू इ. दिला जातो. जिल्हा परिषदेच्या महिला व

बालकल्याण विभागामार्फत जि.प.सेस सन २०१६-१७ मधून रक्कम रुपये ४५.०० लक्ष इतक्या निधीतून कुपोषित बालके, गरोदर व स्तनदा माता, किशोरवयीन मुली यांच्यासाठी अतिरिक्त आहार प्रोटीन पावडरच्या स्वरुपात उपलब्ध करुन देण्यात आला. तसेच सदर निधी रक्कम रुपये ४५.०० लक्ष पैकी रक्कम रुपये १०.०० लक्ष निधीतून सोलापूर जिल्ह्यातील HIV ग्रस्त बालकांना अतिरिक्त आहार उपलब्ध करुन दिलेला आहे.

(४) याबाबत जिल्हा परीषद, सोलापूर कार्यालयामार्फत चौकशी करण्यात आली असून निधीचा अपव्यय केल्याची एकही घटना निदर्शनास आलेली नसल्यामुळे अशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

-----------------

**राज्यात मेंढी चराईसाठी उपलब्ध असलेल्या व नसलेल्या वन विभागाच्या क्षेत्राबाबत अभ्यास करण्यासाठी स्थापन केलेल्या समितीच्या अहवालाबाबत**

**(१५) * २५८३४ श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.आनंदराव पाटील, श्री.संजय दत्त : दिनांक ३ ऑगस्ट, २०१६ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ३ मधील प्रश्न क्रमांक १५४७० ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मेंढी चराईसाठी उपलब्ध असलेल्या व नसलेल्या वन विभागाच्या क्षेत्राबाबत अभ्यास करण्यासाठी शासनाने दिनांक २ सप्टेंबर, २०१५ रोजी एक समिती स्थापन केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर समितीचा अहवाल माहे डिसेंबर, २०१५ अखेर पुर्ण होईल असे आश्वासन मा.वनेमंत्री यांनी दिनांक १० डिसेंबर, २०१५ रोजी राज्य विधानपरिषदेत दिलेले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने अहवाल जाहीर केला आहे काय, त्या अहवालाचे स्वरुप अशा प्रकारचे आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१), (२) व (३) दिनांक ०२/०९/२०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्यात मेंढी चराईसाठी उपलब्ध असलेल्या व नसलेल्या वनविभागाच्या क्षेत्राबाबत अभ्यास करण्यासाठी शासनाने एक समिती गठीत

करण्यात आली आहे. सदर समितीने आपला अहवाल प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे मार्फत दिनांक २८/०४/२०१६ रोजी शासनास सादर केला आहे. सदर समितीच्या अहवालातील शिफारशी शासनाच्या विचाराधीन आहेत. अद्याप समितीचा अहवाल जाहीर करण्यात आलेला नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**खुतेड (ता.विक्रमगड, जि.पालघर) ग्रामपंचायमध्ये रोजगार हमी योजनेंतर्गत काम केलेल्या मजूरांच्या मानधनात गैरव्यवहार झाल्याबाबत**

**(१६) * २५८९६ श्री.रविंद्र फाटक, श्री.किरण पावसकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.नरेंद्र पाटील, श्रीमती विद्या चव्हाण :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खुतेड (ता.विक्रमगड, जि.पालघर) ग्रामपंचायतमधील १२ पाड्यांच्या महात्मा गांधी रोजगार हमी योजनेत काम केलेल्या अनेक मजूरांना आपल्या हक्काचे पैसे मिळाले नसल्याचे तसेच ठेकेदार, अधिकारी यांनी मजूरांच्या नावाखाली दिनांक १२ ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास पैसे घेतल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त तालुक्यातील रोजगार हमी योजनेच्या कामात अधिकारी यांनी गैरव्यवहार केल्याने याची चौकशी करावी असे निवेदन आदिवासी विद्यार्थी कृती समितीने जिल्हाधिकारी, पालघर यांना दिनांक २० सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, रोजगार हमी योजनेतून अनेक रस्त्यांची कामे कागदोपत्री झाल्याचे दाखविण्यात आले आहे, मात्र प्रत्यक्षात ही कामे झाली नसल्याचे निदर्शनास येत आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. जयकुमार रावल :** (१) अंशत: खरे आहे.
(२) हे खरे आहे.

(३) हे खरे नाही. तथापि, आदिवासी विद्यार्थी कृती समितीने निवेदनाद्वारे या संदर्भात तक्रार केलेली आहे.
(४) प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने उपविभागीय अधिकारी, वाडा यांना वस्तुनिष्ठ अहवाल सादर करणेबाबत जिल्हाधिकारी, पालघर यांनी आदेश दिले आहेत.

-----------------

**मराठवाडा विभागासाठी सक्षम जल आयुक्तालय सुरु करणेबाबत**

**(१७) * २३४९४ श्री.अमरसिंह पंडित, श्री.नरेंद्र पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक १६०१४ ला दिनांक १८ मार्च, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :**
सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मराठवाडा विभागासाठी सक्षम जल आयुक्तालय सुरु करण्याची मागणी दुष्काळग्रस्त जनतेतून सातत्याने करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या मागणीबाबत लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ४ ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास मा. मुख्यमंत्री यांना निवेदन देऊन औरंगाबाद मंत्रिमंडळ बैठकीत निर्णय घेण्याची मागणी केली होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, औरंगाबाद येथे सक्षम जल आयुक्तालय कधी सुरु होणार आहे, त्याचे स्वरूप कसे असणार आहे, उक्त प्रकरणी आवश्यक निधी वा इतर प्रशासकीय बाबींची पूर्तता कधी पूर्ण होणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) होय, खरे आहे.
(२) होय, खरे आहे.
(३) व (४) दिनांक ४ ऑक्टोबर, २०१६ रोजी औरंगाबाद येथे झालेल्या राज्य मंत्रीमंडळाच्या बैठकीत औरंगाबाद येथे जलसंधारण आयुक्तालयाची स्थापन करण्यास तत्वत: मान्यता देण्यात आलेली आहे. जलसंधारण आयुक्तालयाचे स्वरुप आवश्यक निधी व इतर प्रशासकीय बाबी या संदर्भातील प्रस्ताव उच्चाधिकारी समितीसमोर ठेवण्यासाठी वित्त विभागास सादर करण्यात आलेला आहे. उच्चाधिकारी समितीच्या मान्यतेनंतर प्रस्ताव मंत्रीमंडळास सादर करण्यात येईल.

-----------------

## आर्णी (जि.यवतमाळ) तालुक्यातील कोसदनी बीटमध्ये लाखो रुपयांच्या सागवानाची तोड केल्याबाबत

**(१८) * २५०७३ श्री.ख्वाजा बेग, श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आर्णी (जि.यवतमाळ) तालुक्यातील येथील कोसदनी बीटमध्ये लाखो रुपयांच्या सागवानाची तोड केल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्याअनुषंगाने संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## खाद्यतेल, तेलबिया, वनस्पती यासारख्या जीवनावश्यक वस्तूंवरील व्हॅट वाढविण्याच्या निर्णयाबाबत

**(१९) * २४५५४ श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने खाद्यतेल, तेलबिया, वनस्पती यासारख्या जीवनावश्यक वस्तूंवरील व्हॅट वाढविण्याचा निर्णय कोणतीही पूर्वसूचना व मुदत न देता दिनांक १७ सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास घेतलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निर्णयाची अंमलबजावणी त्वरीत सुरु केल्यामुळे अनेक अडचणी निर्माण झालेल्या असून पूना मर्चटस् चेंबरने व्हॅटसंदर्भातील अडचणींबाबत मा.मुख्यमंत्री यांना माहे सप्टेंबर, २०१६ च्या तिसऱ्या आठवड्यात निवेदन सादर केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, व्यापारी वर्गापुढे मोठ्या अडचणी निर्माण झाल्याने शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) होय. दिनांक १६ सप्टेंबर, २०१६ रोजी अधिसूचनेद्वारे निम्न कराचा दर ५.५% वरुन ६% तर उच्च कराचा दर १२.५% वरुन १३.५% वाढविण्यात आला. मूल्यवर्धित कर कायद्यांतर्गत प्राविधानानुसार वस्तूवरील कराच्या दरामध्ये करावयाच्या बदलाबाबत पूर्वसूचना वा मुदत देण्याचे प्राविधान नाही.

(२) होय. पूना मर्चंट्स चेंबर यांचे कर संदर्भात बदल करताना कमीत कमी तीन महिने अगोदर माहिती उपलब्ध करुन देण्याविषयीचे निवेदन प्राप्त झाले आहे.

(३) विविध लोकोपयोगी योजना अंतर्गत राज्यावरील वित्तीय भाराचा विचार करता दिनांक १६ सप्टेंबर, २०१६ रोजी मूल्यवर्धित कराचे दर वाढविण्यात आले.

(४) लागू नाही.

-----------------

**सोलापूर जिल्ह्यातील नातेपूते शहरात व परिसरात डेंग्यूची साथ पसरल्याबाबत**

**(२०) * २५५४६ श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्ह्यातील नातेपूते शहरात व परिसरात डेंग्यूने थैमान घातले असून सर्व दवाखान्यात रुग्णांची संख्या प्रचंड असून रुग्णांना दाखल करुन घेण्यासाठी जागा शिल्लक नसून १० रुग्ण अत्यवस्थ असल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जीवघेण्या डेंग्यूचा साथीवर नियंत्रण मिळविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे नाही.

सोलापूर शहरातील नातेपुते शहरात माहे जानेवारी ते सप्टेंबर, २०१६ मध्ये २३ संशयीत डेंग्यू ताप रुग्णांचे रक्तजल नमुने सेंटीनल सेंटर सोलापूर येथे पाठविले असता त्यापैकी एक रक्तजल नमुना डेंग्यू रोगासाठी दूषित आढळून आला आहे. तसेच दरम्यानचे काळात कोणताही रुग्ण अत्यवस्थ असल्याचे आढळून आलेले नाही. त्यामुळे रुग्णांना दाखल करुन घेण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.

(२) सोलापूर जिल्ह्यात व नातेपुते शहरात किटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत डेंग्यू आजाराच्या प्रतिबंध व नियंत्रणासाठी सर्व आवश्यक त्या उपाययोजना नियमितपणे राबविल्या जातात.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**शिवाजीनगर, गोवंडी (मुंबई) येथील प्रत्येक अंगणवाडीतील मुले कुपोषित असल्याबाबत**

**(२१) * २४९१४ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिवाजीनगर, गोवंडी (मुंबई) येथील प्रत्येक अंगणवाडीतील ५० मुलांमागे १३ मुले कुपोषित असल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, १७०० मुले कुपोषित असून यातील ४०० हून अधिक मुले तीव्र कुपोषित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करुन या कुपोषित बालकांवर उपचार करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

तथापि, शिवाजीनगर (मुंबई) नागरी प्रकल्पांतर्गत माहे सप्टेंबर, २०१५ व सप्टेंबर, २०१६ या कालावधीतील कुपोषणाबाबतची श्रेणीनिहाय आकडेवारी पाहता सप्टेंबर, २०१५ च्या तुलनेत माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये तीव्र कमी वजनाच्या बालकांच्या टक्केवारीत घट झालेली आहे.

(३) व (४) सदर योजने अंतर्गत सर्वसाधारण श्रेणीतील बालकांना दररोज (५०० उष्मांक आणि १२ ते १५ ग्रॅम प्रथिने असलेला) आहार देण्यात येतो. त्याचप्रमाणे तीव्र कमी वजनाच्या बालकांना (८०० उष्मांक आणि २० ते २५ ग्रॅम प्रथिने असलेला) आहार देण्यात येतो. याप्रमाणे अंगणवाडीतील लाभार्थ्यांना पोषण आहारातुन आवश्यक ते प्रथिने व कॅलरीज देण्यात येत आहेत.

मध्यम कमी वजनाची व तीव्र कमी वजनाच्या बालकांना वैद्यकीय उपचारासाठी लोकमान्य टिळक हॉस्पीटल, सायन, मुंबई येथे संदर्भ सेवेद्वारे पाठविण्यात येत अशा कुपोषित मुलांची नियमित आरोग्य तपासणी, लसीकरण महानगरपालिका एम वॉर्ड अंतर्गत असलेल्या आरोग्य केंद्राद्वारे करण्यात येत आहे.

-----------------

## दिवेआगार (ता.श्रीवर्धन, जि.रायगड) या जगप्रसिध्द धार्मिक व पर्यटनस्थळाचा विकास करण्याबाबत

**(२२) * २३५३४ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिवेआगार (ता.श्रीवर्धन, जि.रायगड) या जगप्रसिध्द धार्मिक व पर्यटन स्थळांच्या विकासकामासाठी रुपये ९ कोटीचा निधी उपलब्ध करून दिला असून त्यापैकी रुपये साडेआठ कोटीचा निधी खर्च झालेला असतानाही पर्यटन केंद्राच्या विकासाचे काम अपूर्णावस्थेत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पर्यटन क्षेत्राच्या विकासाची कामे प्रलंबित राहण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सदरहू पर्यटन विकासाचे काम हाती घेवून पर्यटन केंद्र कार्यान्वित होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल :** (१), (२), (३) व (४) दिवेआगर, ता.श्रीवर्धन, जि.रायगड या धार्मिक व पर्यटन स्थळाच्या विकास कामांसाठी रुपये ९९१.३७ लक्ष निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे व त्यापैकी रुपये ९०१.६४ लक्ष इतका निधी खर्च करण्यात आलेला आहे. या कामांमधील श्री क्षेत्र दिवेआगर येथील सुवर्ण मंदिराचे काम अंतिम टप्प्यात असून डिसेंबर, २०१६ अखेर पुर्ण करण्याचे नियोजित आहे. चार कामे पूर्ण झाली आहेत.

-----------------

**तारुगव्हाण (ता.पाथरी, जि.परभणी) बंधाऱ्यास निधी उपलब्ध करून देण्याबाबत**

**(२३) * २४५१२ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तारूगव्हाण (ता.पाथरी, जि.परभणी) या ४००० हेक्टर जमीन सिंचनाखाली आणणाऱ्या गोदावरी नदीवरील उच्चस्तरीय बंधाऱ्याच्या कामासाठी लागणारा निधी उपलब्ध झाला नसल्याने बंधाऱ्याचे काम प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बंधाऱ्याचे काम पुर्ण करण्यासाठी लागणारा पुरेसा निधी उपलब्ध करून देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, किती मुदतीत सदरील निधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) हे अंशत: खरे आहे.

प्रस्तुत बंधाऱ्याची प्रकल्पीय सिंचन क्षमता २१०० हे. एवढी आहे.

(२) व (३) राज्याच्या अर्थोपायाची स्थिती व मा.राज्यपाल महोदयांच्या निदेशानुसार मराठवाडा विभागास उपलब्ध होणारा निधी तसेच प्रकल्पाचे सद्यस्थितीनुसार प्राधान्यक्रम विचारात घेऊन निधी उपलब्ध करुन देण्यात येईल.

-----------------

**परभणी शहरातील पार्वतीनगर भागातील तुरावत बालगृहात**
**मुलीवर अत्याचार झाल्याबाबत**

**(२४) * २४१७१ श्री.धनंजय मुंडे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.सुभाष झांबड, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी येथील पार्वतीनगर भागातील बाबा एज्युकेशन सोसायटीच्या तुरावत बालगृहात एका १३ वर्षीय मुलीवर बालगृह चालकाच्या मुलाने वर्षभर अत्याचार केल्याची घटना माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषींवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) नवा मोंढा पोलीस स्टेशन, परभणी येथे एफआयआर क्र. ०४०१/२०१६ दिनांक ०७/०८/२०१६ अन्वये भा.दं.वि. ३७६ क, ३४ आणि बालकांचे लैंगिक अपराधापासून संरक्षण अधिनियम २०१२ चे कलम ३,४,६,८,१२ आणि १७ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात येवून सदर संस्थेच्या संस्थाचालक आणि तिचा मुलगा यांना अटक करण्यात आली आहे.

महिला व बाल विकास आयुक्तालयाने त्यांचे दि.१३/१०/२०१६ रोजीच्या आदेशान्वये सदर बालगृहाची मान्यता रद्द करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मौजे निमगांव (ता.मालेगांव, जि.नाशिक) येथे ग्रामीण रुग्णालय मंजूर करणेबाबत**

**(२५) * २३५१३ डॉ.अपूर्व हिरे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे निमगांव (ता.मालेगांव, जि.नाशिक) येथे प्राथमिक आरोग्य केंद्राची मर्यादा, निमगांव परिसरातील गांवे व तेथील लोकसंख्येतील वाढ, प्राथमिक आरोग्य केंद्रातील कमी पडणाऱ्या उपलब्ध सोयी सुविधाचा विचार करता निमगांव येथे स्वतंत्र ग्रामीण रुग्णालय सुरु करण्याची मागणी लोकप्रतिनिधी (नाशिक) यांनी दिनांक २६ ऑगस्ट, २०१६ रोजीच्या पत्रान्वये मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मौजे निमगांव व परिसरातील गावांची लोकसंख्या मोठी असल्याने प्राथमिक आरोग्य केंद्रातील सोयी सुविधा अपुऱ्या ठरतात, यासाठी मौजे निमगांव येथे स्वतंत्र ग्रामीण रुग्णालय सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) सदर निवेदन शासनास प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही.

(२) तथापि, शासनस्तरावर सन २०११ च्या जनगणनेवर आधारीत जोड बृहत आराखडा करण्याची कार्यवाही सुरु आहे. सदर निवेदन प्राप्त झाल्यास आपली मागणी जोड बृहत आराखडा अंतिम करताना निकषानुसार विचारात घेतली जाईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

**भिवंडी महापालिका कार्यक्षेत्रातील नोंदणीकृत रुग्णालयांमध्ये अप्रशिक्षित परिचारिका कार्यरत असल्याबाबत**

**(२६) * २५९३२ श्री.सुजितसिंह ठाकूर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी महापालिका कार्यक्षेत्रातील नोंदणीकृत असलेल्या १०१ रुग्णालयांमध्ये तब्बल ८४ अप्रशिक्षित परिचारिका कार्यरत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अप्रशिक्षित परिचारिका कार्यरत असल्यामुळे रुग्णांच्या जीवाला धोका निर्माण झाला असून यासंदर्भात फौजदारी गुन्हे दाखल करण्याबाबत अखिल महाराष्ट्र जनरल कामगार युनियनचे अध्यक्षांनी घेतलेल्या पत्रकार परिषदेत मा.सार्वजनिक आरोग्य मंत्र्यांकडे मागणी केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) महानगरपालिका कार्यक्षेत्रातील सन २०१६-१७ मध्ये १०१ खाजगी हॉस्पिटल, मॅटर्निटी होम व डे केअर सेन्टर पैकी ६४ हॉस्पिटल, मॅटर्निटी होम व डे केअर सेन्टर यांची तपासणी पूर्ण करण्यात आली.

यापैकी ३ हॉस्पिटलमध्ये ११ अप्रशिक्षित परिचारिका आढळून आल्यामुळे बॉम्बे नर्सिंग होम रजिस्ट्रेशन ॲक्ट, १९४९ (सुधारीत) २००५ चे कलम २२ अन्वये ३ हॉस्पिटलची नोंदणी रद्द करण्यात आली आहे.

उर्वरीत ३७ हॉस्पिटल, मॅटर्निटी होम व डे केअर सेन्टर यांचे तपासणीची कार्यवाही सद्या सुरु आहे.

(२) अशी मागणी केल्याचे आढळून येत नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## मारेगाव (जि.यवतमाळ) तालुक्यातील रोहयोंतर्गत अल्पभूधारक शेतकऱ्यांना विहिरींचे अनुदान व खोदकाम करणाऱ्या मजूरांना मजुरी मिळण्याबाबत

**(२७) * २४६७९ श्री.हरिसिंग राठोड, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मारेगाव (जि.यवतमाळ) तालुक्यातील ६५ अल्पभूधारक शेतकऱ्यांनी रोहयोंतर्गत विहिरींचे खोदकाम केले. परंतु बांधकाम पूर्ण होऊन ६५ अल्पभूधारक शेतकऱ्यांना विहिर अनुदान व विहिरींवर खोदकाम करणाऱ्या ९७० मजुरांना थकित मजुरी मिळाली नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने निर्णय घेऊन या अल्पभूधारक शेतकरी व या विहिरींवर खोदकाम करणाऱ्या मजुरांना त्यांचे थकीत अनुदान देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल :** (१) हे अंशतः खरे आहे.

(२) धडक सिंचन मधून नरेगामध्ये रुपांतरीत ६७ विहिरींची प्रदाने जिल्हा मध्यवर्ती बँकेमध्ये खाते असलेल्या लाभार्थ्यांना सॉफ्टवेअरचे अडचणीमुळे अदायगी करण्यास विलंब झाला होता. खोदकाम करण्यासाठी निर्गमित एकुण १७६ हजेरीपटावर उपस्थित असलेल्या १५८९ मजूरांपैकी १५४५ मजूरांचे मजूरी त्यांच्या खात्यात वर्ग करण्यात आली असून उर्वरित ४४ मजूरांची मजूरी त्यांच्या खात्यात वर्ग करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## साठवण तलाव ममदापूर (ता.येवला, जि.नाशिक) या योजनेचे काम सुरु करणेबाबत

**(२८) * २३६०९ श्री.जयवंतराव जाधव :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) साठवण तलाव ममदापूर (ता.येवला, जि.नाशिक) या योजनेचे काम सुरु करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १७ सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास लघुसिंचन (जलसंधारण) विभागाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेच्या कामाला दिनांक २० ऑगस्ट, २०१४ रोजी वा त्यासुमारास जिल्हाधिकारी, नाशिक यांनी प्रशासकीय मंजुरी देऊन शासनाकडे पाठविलेल्या प्रस्तावाला सचिव समितीच्या मान्यतेची आवश्यकता नसल्याचे ग्रामविकास व जलसंधारण विभागाने दिनांक १० डिसेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास कळविले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वर्ष होऊनही या योजनेची सुधारीत तांत्रिक मंजुरी रखडल्यामुळे सदर योजनेची निविदा प्रक्रिया होवू शकली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, प्रश्न भाग (१), (२) व (३) अनुषंगाने साठवण तलाव ममदापूर या योजनेचे काम सुरु करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) व (२) होय.

(३) तांत्रिक मान्यतेची कार्यवाही प्रगतीत आहे.

(४) जिल्हाधिकारी, नाशिक यांनी दिनांक २०/६/२०१६ चे पत्रान्वये सचिव समितीच्या मान्यतेची अट शिथील केलेली असून वन जमीन प्रस्तावाची आणि तांत्रिक मान्यतेची कार्यवाही प्रगतीत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील अतिदुर्गम भागातील हंगामी डॉक्टरांना**
**कायमस्वरुपी सेवेत सामावून घेण्याबाबत**

**(२९) * २४७९१ श्री.अमरिशभाई पटेल, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील नंदुरबार, अमरावती, जव्हारसह दुर्गम आदिवासी भागात तसेच नक्षलग्रस्त गडचिरोली भागातील वाढते बालमृत्यू, कुपोषण आणि आरोग्याच्या गंभीर समस्या लक्षात घेऊन ११ वर्षापूर्वी ८२२ बी.ए.एम.एस. डॉक्टराना हंगामी सेवेत घेऊन त्यांना दुर्गम अशा आदिवासी भागातील प्राथमिक आरोग्य केंद्रात नियुक्ती करण्यात आली, तसेच शासनाने या सर्व डॉक्टर्सना सेवेत कायम करण्याचा प्रस्तावही शासनास सन २०१३ साली देऊनही त्यांना सेवेत कायम करण्यात आले नसल्याने दिनांक ८ सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २००३ साली सदर बी.ए.एम.एस. डॉक्टरांना हंगामी सेवेत सामावून घेतले असून अकरा वर्ष उलटूनही सदर डॉक्टरांना सेवेत कायम न केल्याचे समजते तसेच या डॉक्टरांना दर अकरा महिन्यांनी शासनाकडून सेवेत काम करण्यासाठी आदेश घ्यावे लागतात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आदिवासी व दुर्गम भागातील हंगामी डॉक्टरांनी त्यांना सेवेत कायम करुन ब संवर्गामधून अ संवर्गात घ्यावे अशी शासनाकडे अनेक वेळा मागणी केली होती, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन अतिदुर्गम भागातील हंगामी डॉक्टरांना कायमस्वरुपी सेवेत सामावून घेण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) ७९१ अस्थायी वैद्यकीय अधिकाऱ्यांचे शासन सेवेत समावेशन करण्याबाबत शासनाच्या विचाराधीन आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील संगणक परिचालकांना प्रलंबित वेतन अदा करण्याबाबत**

**(३०) * २३८९५ ॲड.निरंजन डावखरे, श्री.अनिल भोसले, श्री.जयवंतराव जाधव, श्री.ख्वाजा बेग, श्री.गिरीशचंद्र व्यास : तारांकित प्रश्न क्रमांक २१६१८ ला दिनांक १८ जुलै, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात ई पंचायत प्रकल्पामध्ये केंद्र शासनाच्या सहाय्याने माहे एप्रिल, २०११ पासून संग्राम प्रकल्प राबविण्यात येत असून त्यामध्ये हजारो संगणक परिचालक काम करीत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दिनांक २५ जुलै, २०१६ रोजी जे.जे. उड्डाण पुलाजवळ महाराष्ट्र राज्य संगणक परिचालक संघटनेच्या आदोलकांनी अडीच तास रस्त्यावर बसून त्यांच्या विविध मागण्यासाठी रास्ता रोको आंदोलन केले, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, राज्यातील ग्रामपंचायतीमध्ये काम करणाऱ्या २७ हजार संगणक परिचालकांना गेल्या ९ महिन्यांपासून (माहे जानेवारी, २०१६ पासून) वेतन अदा करण्यात आले नसल्याचे दिनांक ११ सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाने संगणक परिचालकांची दखल घेऊन त्यांना ९ महिन्यांचे थकित वेतन देण्यात यावे तसेच सर्व संगणक परिचालकांना शासनाच्या नवीन प्रकल्पात समाविष्ट करुन घेण्यासंदर्भात लादण्यात आलेल्या अटी रद्द करुन या सर्व संगणक परिचालकांवरील अन्याय दूर करावा, अन्यथा त्याबाबत तीव्र आंदोलन करण्यासंदर्भातील निवेदन महाराष्ट्र राज्य परिचालक संघटनेने मा.मुख्यमंत्री महोदयांना माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान दिले आहे, हे खरे आहे काय,
(५) असल्यास, सदरहू निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

१३ व्या वित्त आयोगांतर्गत चालविण्यात आलेला संग्राम प्रकल्प माहे डिसेंबर, २०१५ मध्ये बंद करण्यात आला आहे. १४ व्या वित्त आयोगाच्या प्राप्त निधीमधून राज्यातील ग्रामपंचायतीमध्ये आपले सरकार सेवा केंद्र उभारण्याबाबतच्या मार्गदर्शक सूचना दिनांक ११/८/२०१६ रोजीच्या शासन निर्णया अन्वये निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

(३) माहे जानेवारी, २०१६ पासून प्रकल्प सुरु नसल्यामुळे थकीत वेतनाचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) हे खरे आहे.

(५) नवीन आपले सरकार सेवा केंद्र राज्यभरातील ग्रामपंचायतींमध्ये सुरु करण्याची प्रक्रिया सुरु आहे. त्यामुळे कार्यवाहीचा प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

**राज्यातील ४०० धरणे असुरक्षित असल्याबाबत**

**(३१) * २५३५२ ॲड.राहुल नार्वेकर, श्री.हेमंत टकले, श्री.धनंजय मुंडे, श्री.आनंद ठाकूर, श्री.ख्वाजा बेग, श्री.संजय दत्त : तारांकित स्वीकृत प्रश्न क्रमांक ७१२४ ला दिनांक २१ जुलै, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ४०० धरणे असुरक्षित असल्याचा अहवाल महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्थेने (मेरी) शासनाला सादर केला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या ४०० धरणांच्या तात्काळ दुरुस्त्या करण्याची शिफारसही मेरी ने केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर ४०० धरणांची दुरुस्ती किती कालावधीमध्ये पूर्ण करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) व (२) राज्यातील सर्व मोठया धरणांची तपासणी क्षेत्रीय सक्षम अधिका-यांमार्फत होत असते. धरण सुरक्षितता संघटना, नाशिक कडून काही निवडक धरणांची चाचणी तपासणी केली जाते. सन २०१३ च्या धरण स्थिती अहवालाप्रमाणे एकूण १२२६ मोठया धरणांपैकी (वर्ग १ व २) ४०२

धरणांवर संवर्ग २ त्रुटी आढळल्या आहेत. संवर्ग २ त्रुटी म्हणजे दुरुस्त करण्याजोग्या त्रुटी ज्यांकडे त्वरीत लक्ष देणे गरजेचे आहे. सद्यस्थितीत कोणत्याही धरणांना गंभीर धोका निर्माण झालेला नाही.

(३) धरण सुरक्षितता संघटनेच्या अहवालानुसार करावयाच्या सुधारणा व त्यावर संनियंत्रण ठेवण्याची जबाबदारी महासंचालक, मेरी यांच्यावर सोपविण्यात आलेली आहे. त्रुटींच्या दुरुस्तीची कार्यवाही निधी उपलब्धतेनुसार क्षेत्रीय अभियंत्यांकडून केली जाते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**महाराष्ट्र व तेलंगणा राज्यात सिंचन प्रकल्प उभारणीबद्दल केलेल्या कराराबाबत**

**(३२) * २३५४१ श्री.संजय दत्त, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र व तेलंगणा राज्यात सिंचन प्रकल्प उभारणीबद्दल करार करण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या करारानुसार राज्याच्या निम्न पैनगंगा प्रकल्प धोक्यात आला असून त्यावर खर्च केलेले ११०० कोटी वाया जाण्याची भिती व्यक्त करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर करार हा राज्यासाठी कमी तर तेलंगणासाठी अधिक फायद्याचा ठरणार असल्याने कराराबाबत शासनाने आपली भुमिका स्पष्ट करुन त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय, खरे आहे.

दिनांक ०८/०३/२०१६ रोजी महाराष्ट्र व तेलंगणा या दोन्ही राज्याच्या मुख्यमंत्री स्तरावरील बैठकीत दोन्ही राज्यातील आंतरराज्यीय सिंचन प्रकल्पांचे सर्व निर्णय घेण्यासाठी व निर्णय प्रक्रिया गतीमान करण्यासाठी आंतरराज्यीय मंडळ स्थापन करण्याचा करार केला आहे. आंतरराज्यीय मंडळ स्थापन केल्याबाबत शासनाने दिनांक ४/७/२०१६ रोजी आदेश निर्गमित केले आहेत.

(२) नाही. हे खरे नाही.

निम्न पैनगंगा प्रकल्पाचा समावेश आंतरराज्यीय करारात असुन सदर प्रकल्प धोक्यात आला नाही. सप्टेंबर, २०१६ अखेर निम्न पैनगंगा प्रकल्पावर फक्त रुपये २९९.७६ कोटी इतकाच खर्च झालेला आहे.

(३) सदर करार हा गोदावरी पाणी तंटा लवादाचे चौकटीतच करण्यात आला आहे. गोदावरी पाणी तंटा लवादाने उभय राज्यांना दिलेल्या पाणी हिश्श्यात या करारामुळे कोणतीही बाधा पोहचत नाही.

सदर कराराचे अनुषंगाने दिनांक २३ ऑगस्ट, २०१६ रोजी आंतरराज्य प्रकल्पाबाबत निर्णय घेणेसाठी आंतरराज्य मंडळाची बैठक झाली.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

## पोखरापूर (ता.मोहोळ, जि.सोलापूर) येथील पाटबंधारे तलावात आष्टी उपसा सिंचन योजनेतून पाणी सोडणेबाबत

**(३३) * २६०२२ श्री.दत्तात्रय सावंत, श्री.श्रीकांत देशपांडे :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पोखरापूर (ता.मोहोळ, जि.सोलापूर) येथील पाटबंधारे तलावात आष्टी उपसा सिंचन योजनेतून पाणी सोडण्यासाठी पोखारपूर, सारोळे खवणी येथील नागरिकांनी वारंवार आंदोलने, उपोषणे केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेसाठी सुधारित प्रकल्प अहवालास महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे यांनी मंजुरी दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकल्पासाठी लागणार निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाचे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय.

(२) मोहोळ तालुक्यातील पोखरापूर, खवणी व सारोळे या गावांना सिंचनाचा लाभ मिळण्यासाठी ५८५ हे. क्षेत्राच्या आष्टी उपसा सिंचन योजनेअंतर्गत टप्पा-२ मध्ये समाविष्ट पोखरापूर योजनेस सन २००१ मध्ये शासनाने तत्वत: मान्यता दिलेली आहे. सदर योजनेचा समावेश आष्टी उपसा सिंचन योजनेच्या प्रथम सुप्रमा अहवालात केला असून, या योजनेच्या प्रथम सुप्रमा अहवालास दिनांक १/११/२०१० अन्वये मान्यता दिलेली आहे.

(३) सन २०१६-१७ मध्ये आष्टी उपसा सिंचन योजनेकरीता रुपये २९.०० कोटी निधीची तरतूद केली आहे. या निधीतून पोखरापूर योजनेसाठी निधी उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अकोला जिल्हयातील खारपाणपट्टयासाठी महत्वपूर्ण असलेल्या बॅरेजना सुधारित प्रशासकीय मान्यता मिळण्याबाबत

**(३४) * २५८०० श्री.गोपिकिशन बाजोरीया :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोला जिल्हयातील खारपाणपट्टयासाठी महत्वपूर्ण असलेल्या उमा बॅरेज प्रकल्प, घुंगशी बॅरेज मध्यम प्रकल्प आणि काटेपूर्णा बॅरेज व इतर बॅरेज संदर्भातील सुधारित प्रशासकीय मान्यता दोन महिन्यात देण्याचे आश्वासन जुलै, २०१६ च्या अधिवेशनात देऊनही कोणतीच कार्यवाही झालेली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर आश्वासनाची पूर्तता व उक्त प्रकल्पाचे काम सुरु करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) उक्त प्रकल्पांना सुधारित प्रशासकीय मान्यता देणेची कार्यवाही प्रगतीत आहे.
(२) व (३) पूर्णा बॅरेज-प्रस्ताव राज्य तांत्रिक सल्लागार समिती, नाशिक कडे तपासणीधीन आहे.

कवठा (बॅ) प्रकल्प- राज्य तांत्रिक सल्लागार समिती यांनी ७७ व्या बैठकीत दि. ११/७/२०१६ अन्वये सुधारित प्रशासकीय मान्यता प्रस्ताव अंतिम केलेला असून प्रस्ताव त्रिसदस्यीय सचिव समितीच्या सहमतीसाठी सादर करण्यात आलेला आहे.

उमा बॅरेज - प्रस्तावावर क्षेत्रीय स्तरावर कार्यवाही सुरू आहे.

घुंगशी बॅरेज - राज्य तांत्रिक सल्लागार समिती, नाशिक यांचे शेऱ्यांची पूर्तता महामंडळ स्तरावर प्रगतीत आहे.

काटेपूर्णा - राज्य तांत्रिक सल्लागार समिती यांचे सल्यानुसार बंद पाईप वितरण तरतुदींचा अंतर्भाव करून प्रस्ताव सुधारित करणेची कार्यवाही प्रगतीत आहे.

दिनांक ०९/०९/२०१५ चे शासन निर्णयात नमूद कार्यपध्दतीनुसार सदर प्रकल्पांना सुधारित प्रशासकीय मान्यता देणेबाबतची कार्यवाही करणेत येईल.

-----------------

**इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय नागपूर येथे रक्तातील घटक वेगळे करणारे ब्लड कँम्पोनन्ट युनिट कार्यान्वित नसल्याबाबत**

**(३५) * २५४८८ श्री.मितेश भांगडिया :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय नागपूर येथे रक्तातील घटक वेगळे करणारे ब्लड कँम्पोनन्टच्या दोन्ही युनिटला सहा महिन्यापेक्षा जास्त कालावधी होऊनही ते अद्याप कार्यान्वित झालेले नसल्याचे दिनांक २५ सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर युनिटपैकी एक युनिट रक्त संक्रमण परिषदेने दिलेले असून दुसरे युनिट वैद्यकीय शिक्षण व संशोधन विभागाने पुरविलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सामान्य नागरिकांच्या सोयीकरीता हे दोन्ही रक्त घटक युनिट त्वरीत लावण्यात येणार आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे आहे.

(३) सदर दोन्ही रक्त घटक युनिट रुग्णसोयीसाठी कार्यान्वित करण्यात आलेले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील टी.एच.आर. घरपोच पोषण आहार योजना**
**पुरवठ्यासंदर्भातील निर्णयाबाबत**

**(३६) * २४६६६ श्री.चंद्रकांत रघुवंशी, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एकात्मिक बाल विकास सेवा योजना व सबला योजनेंतर्गत अंगणवाडीतील ६ महिने ते ३ वर्ष वयोगटातील सर्व बालके व गर्भवती स्त्रिया व स्तनदा मातांसाठी घरपोच पोषण आहार (THR) पुरविण्यासाठी अभिव्यक्ती स्वारस्य पद्धतीने निविदा मागविण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी लाभधारकांना गुणवत्तापूर्ण आहार पुरविण्याबाबत घेतलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) असल्यास, लाभधारकांना गुणवत्तापूर्ण आहार पुरविण्याची जबाबदारी कोणाकडे देण्यात आली वा त्याअनुषंगाने लाभधारकांना गुणवत्तापूर्ण आहार पुरविण्यात दोषी असलेल्यांवर काय कारवाई केली जाणार आहे,

(४) तसेच टी.एच.आर. घरपोच पोषण आहार योजना पुरवठ्या संदर्भातील नविन निविदा प्रक्रियेच्या विरोधात औरंगाबाद खंडपीठामध्ये शासनाच्या बाजूने निकाल लागलेला असतानाही शासनाने मा.सर्वोच्च न्यायालयात अपिल केले आहे, हे ही खरे आहे काय,

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर निविदेच्या संदर्भात मा. उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठ येथे रिट याचिका क्र. ३३८७/२०१६ दाखल झालेली होती. सदर याचिकेमध्ये मा. उच्च न्यायालयाने दि. ११ जुलै, २०१६ रोजी खालीलप्रमाणे आदेश दिलेले आहेत.

"The impugned tender notice is set aside to extent of reducing the projects to ७०. All other terms of the tender are held valid. The Respondents shall conduct the survey of the eligible units with regard to extrusion technology (fully automatic plant) and satisfying all other conditions and shall thereafter proceed to form projects and issue tender notice accordingly.

वरील आदेशाबाबत विधी व न्याय विभागाच्या व राज्याचे ॲडव्होकेट जनरल यांच्या अभिप्रायानुसार मा. सर्वोच्च न्यायालयात SLP No. २९१७८/२०१६ दाखल करण्यात आलेली आहे. मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(३) सन २०१३ मध्ये महिला मंडळ/बचतगट/महिला संस्था यांचे मार्फत प्रकल्पनिहाय निविदा अर्ज मागविण्यात आले होते. त्या निविदेनुसार जिल्हा आहार समितीमार्फत ३५४ प्रकल्पांसाठी महिला मंडळ/बचतगट/महिला संस्था यांची निवड करण्यात आली असून त्यांचेमार्फत THR पुरवठा सुरु आहे. उर्वरित १९९ प्रकल्पांना उर्वरित ज्या ठिकाणी २४ मे, २०१३ च्या निविदा प्रक्रियानुसार महिला मंडळ/बचतगट/महिला संस्था यांची निवड झालेली नाही त्या ठिकाणी शासन पत्र क्र. एबावि-२०१३/प्र.क्र.९/का-५ दि.१२ जुलै, २०१३ नुसार सक्षम महिला मंडळ/बचतगट/महिला संस्था तयार होईपर्यत लाभार्थी आहारापासून वंचीत राहू नये म्हणून जुन्या ३ संस्थांमार्फत पुरवठा सुरु आहे.

महिला मंडळ/बचतगट/महिला संस्था यांचेमार्फत लाभधारकांना पुरवठा करण्यात येणाऱ्या आहाराची तपासणी मान्यताप्राप्त प्रयोगशाळेकडून करुन घेण्यात आल्यानंतरच पुरवठा करण्यात येतो.

(४) होय.

विधी व न्याय विभाग व ॲडव्होकेट जनरल यांच्या अभिप्रायानुसार मा. सर्वोच्च न्यायालयात अपील करण्यात आले आहे.

-----------------

## औरंगाबाद जिल्हयातील जिल्हा परिषदेने बांधलेल्या कोल्हापूर बंधाऱ्यांना दरवाजे बसविण्याबाबत

**(३७) * २५१९६ श्री.सतिश चव्हाण, श्री.अमरसिंह पंडित, श्री.धनंजय मुंडे :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्हयात जिल्हा परिषदेमार्फत ग्रामीण भागात पाझर तलाव, गाव तलाव, कोल्हापुरी बंधाऱ्यांचे बांधकामे केली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हयात १५० बंधाऱ्यांना दरवाजेच नसल्याने या बंधाऱ्यामध्ये पाणी अडवणे अवघड झाले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर बंधाऱ्यांना त्वरीत गेट बसवणेसाठी काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) होय.

(२) हे अंशत: खरे आहे.

औरंगाबाद जिल्हा परिषद मार्फत सन १९८८ पासून म्हणजेच सुमारे २८ वर्षापासून कोल्हापूरी पध्दतीचे बंधारे बांधण्यात आले आहेत. त्यामुळे १५ ते ५८ वर्षेपूर्वी बांधण्यात आलेल्या कोल्हापूरी पध्दतीचे बंधाऱ्यांचे लोखंडी गेट सडले असून निकामी झाले आहेत तसेच काही लोखंडी दरवाजे अतिवृष्टीमुळे आलेल्या पूरामध्ये वाहून गेले आहे. त्यामुळे १५० कोल्हापूरी पध्दतीच्या बंधाऱ्यांचे काही दरवाजे उपलब्ध नाहीत.

औरंगाबाद जिल्हयामध्ये ज्या भागामध्ये पर्जन्यमान कमी होते तेथील काही बंधाऱ्यांचे दरवाजे इतर ठिकाणी आवश्यकतेनुसार बसविले व ज्या ठिकाणी पाण्याचा प्रवाह कमी होता त्याठिकाणी उपलब्ध असणाऱ्या दरवाज्यांमधील काही थरातील दरवाजे काढून आवश्यकतेनुसार इतर ठिकाणी बसविले आहेत. त्यामुळे जिल्हयातील एकूण ५८५ पैकी ४४३ कोल्हापूरी पध्दतीचे बंधाऱ्यात पाणी अडविण्यात आले.

(३) जिल्हा परिषद औरंगाबाद उपकरांतर्गत गेट खरेदी करण्यासाठी ई-निविदा प्रसिध्द करण्यात आली होती. परंतु तीनवेळा प्रसिध्दी देवूनही निविदेस प्रतिसाद मिळाला नाही. आगामी हंगामासाठी गेट खरेदी करण्याचे जिल्हा परिषद, औरंगाबाद कार्यालयाचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**नांदेड जिल्हयासाठी शासनाने जाहिर केलेले शासकीय दंत महाविद्‌यालय व रुग्णालय वाशिमला सुरु करण्यात येत असल्याबाबत**

**(३८) * २४७३१ श्री.सुभाष झांबड, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **वैद्‌यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्हयासाठी शासनाने जाहिर केलेले शासकीय दंत महाविद्‌यालय व रुग्णालय मराठवाड्यातून हलवून वाशिमला सुरु करण्यात येणार असल्याचे माहे जून, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नांदेडला दंत महाविद्‌यालय व रुग्णालय सुरु करण्याची जनतेची मागणी लक्षात घेता नांदेड येथे शासकीय दंत महाविद्‌यालय व रुग्णालयाला मंजूरी देऊन ते सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील 'क' वर्ग नगरपालिकांना जलयुक्त शिवार योजनेंतर्गत निधी उपलब्ध करून देण्याबाबत**

**(३९) * २५५९२ श्री.आनंदराव पाटील, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, श्री.शरद रणपिसे :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यभरात सुरु असलेल्या जलयुक्त शिवारात आतापर्यंत ग्रामीण भागाला केंद्रबिंदू मानून निधी वितरीत केला जात होता मात्र यातील नियमांना शिथिल करून राज्यातील 'क' वर्गातील नगरपालिकांना देखील या योजनेंतर्गत निधी उपलब्ध करून दिला जाणार असल्याची माहिती मा. महसुल मंत्री यांनी दिनांक २७ नोव्हेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास दिलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर योजनेचे स्वरुप कशा प्रकारचे आहे, सदरची योजना शासन केव्हापासून सुरु करणार आहे, त्याचा कालावधी साधारण किती दिवसाचा आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) राज्यातील 'क' वर्ग नगरपालिका क्षेत्रात येणाऱ्या नद्या/ओढे यांचे खोलीकरण/रुंदीकरण आणि इतर बाबींचा समावेश करण्यात येईल असे जाहीर केले होते. त्यानुसार शासनाने तत्वता निर्णय घेतला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाने बछड्यांचे आणि वाघिणींचे नियमित मॉनिटरींग करण्याचे निर्देश दिल्याबाबत

**(४०) * २४३२८ प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंदेवाही (जि.चंद्रपूर) येथे वाघिणीच्या बछड्यांचा अन्न पाण्याविना मृत्यू आणि तळोधी-बाळापूर येथे वाघिणीच्या मृत्यूनंतर तिचे बेपत्ता झालेल्या तीन बछड्यांचे प्रकरण पहाता ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाबाहेरच्या जंगलातील २५ बछड्यांच्या सुरक्षेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाने बछड्यांचे आणि वाघिणींचे नियमित मॉनिटरींग करण्याचे निर्देश दिलेले असतांनाही वनखात्याचे अधिकारी व कर्मचाऱ्यांनी दुर्लक्ष केल्यामुळे अशा घटनांमध्ये वाढ झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाने मॉनिटरींग करण्याचे दिलेले आदेश न पाळणाऱ्या कोणकोणत्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) दिनांक १०/०९/२०१६ रोजी सिंदेवाही (जि. चंद्रपूर) येथे एका वाघिणीच्या बछड्याचा मृत्यू झाला आहे. पशुवैद्यकीय अधिकारी यांच्या शवविच्छेदन अहवालात Severe dehydration might have caused hypovolemic shock leading to heart failure असे कारण नमूद करण्यात आले आहे.

बाळापूर परिक्षेत्र कक्ष क्रमांक ७३ मध्ये दिनांक ०४/०९/२०१६ रोजी एक वाघिण मृत अवस्थेत आढळून आली. सदर मृत वाघिणीचे बछडे बेपत्ता आहेत, हे खरे आहे.

तथापि ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाबाहेरच्या जंगलातील बछडयांच्या सुरक्षेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे, हे खरे नाही.

(२) व (३) राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाकडून बछडयांचे आणि वाघिणीचे नियमित मॉनिटरींग करण्याबाबतचे विशेष असे काही निर्देश प्राप्त झालेले नाही. तथापि राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाच्या मार्गदर्शक सूचनान्वये वाघांच्या संवर्धन / संरक्षणार्थ खालीलप्रमाणे उपययोजना करण्यात येतात.

- विदर्भातील पाचही व्याघ्र प्रकल्पात ४ विशेष व्याघ्र दलांची (STPF) स्थापना करण्यात आली आहे. सदर व्याघ्र दलाकडून नियमितपणे गस्त केली जात आहे. तसेच वाघांच्या मृत्यूचे प्रमाण रोखण्यासाठी व त्यांच्या संरक्षणाच्यादृष्टीने खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतात.
- सर्व व्याघ्र प्रकल्प क्षेत्रात वायरलेस यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली आहे.
- जंगलामध्ये आवश्यक त्या ठिकाणी निरीक्षण मनोरे उभारण्यात आले आहे.
- वन्य प्राण्यांच्या हालचालींचे सनियंत्रण ठेवण्याकरीता कॅमेरा ट्रॅप, जीपीएसचा वापर केला जातो.
- संरक्षित क्षेत्रातील नैसर्गिक पाणवठे, कृत्रिम पाणवठ्याची वन कर्मचाऱ्यामार्फत नियमित तपासणी करण्यात येते.
- शिकाऱ्याबाबत गोपनियरित्या माहिती संकलित करण्यात येते.
- वनसंरक्षणात लोकांचा सहभाग वाढवा म्हणून वनालगत असलेल्या गावांमध्ये ग्रामस्थांची वनसंरक्षण समितीची स्थापना करण्यात आली असून त्यांची संरक्षणांच्या कामात मदत घेण्यात येते.
- अमरावती, चंद्रपूर व नागपूर येथे Sniffer Dog ठेवण्यात आले असून त्यांचेद्वारे नियमितपणे रेल्वे स्टेशन / बस स्टँड / आठवडी बाजार व संशयास्पद ठिकाणी वन्य प्राण्यांच्या अवैध व्यापार, वाहतूक याचा शोध घेण्यात येतो.
- वनक्षेत्रांमधून जाणाऱ्या विद्यृत लाईनवर नियमितपणे गस्त करण्यात येते. तसेच विद्यृत विभागातील अधिकारी व कर्मचारी यांचेशी नियमितपणे संपर्क ठेवला जातो व संबंधीत सबस्टेशनचे कार्यक्षेत्रात विद्युत प्रवाह खंडीत झाल्यास त्यांची माहिती घेवून विद्युत प्रवाहाद्वारे वन्य प्राण्यांच्या शिकारीचा प्रयत्न झाला किंवा कसे याची शहानिशा करण्यात येते.
- वन कर्मचाऱ्यामार्फत वनक्षेत्रात रात्र / दिवस नियमितपणे तसेच पावसाळी विशेष गस्त घालण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पतंगशाह कुटीर रुग्णालय (ता.जव्हार, जि.पालघर) २०० खाटांचे करण्याबाबत**

**(४१) * २५३१६ श्री.आनंद ठाकूर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पतंगशाह कुटीर रुग्णालय (ता.जव्हार, जि.पालघर) यात तीन-चार तालुक्यातून उपचारासाठी रुग्ण येत असल्यामुळे, रुग्णांची वाढती संख्या पाहता सदर रुग्णालय २०० खाटांचे करण्यात यावे अशी मागणी स्थानिक नागरिकांनी शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रुग्णालयाला २०० खाटांसाठी शासनाकडून सन २०१३ मध्ये मंजूरी देण्यात आलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) पतंगशाह कुटीर रुग्णालय (ता.जव्हार, जि.पालघर) यांच्या अंदाजपत्रक व आराखड्याच्या मान्यतेबाबत कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**पुणे येथील सावित्रीबाई फुले विद्यापीठाच्या मुख्य इमारतीखाली भुयारी मार्ग असल्याबाबत**

**(४२) * २४७४४ आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील सावित्रीबाई फुले विद्यापीठाच्या मुख्य इमारतीखाली ४०० फूट लांबीचा भुयारी मार्ग असल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुरातन वास्तूकलेचा उत्कृष्ट ठेवा टुरिस्ट पॉईंट म्हणून विकसित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल :** (१) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या आवारात मुख्य इमारत व स्वयंपाक घर (आजचे पोतदार संकुल यांना) जोडणारा ४०० फूट लांबीचा भुयारी मार्ग ब्रिटीश काळापासून अस्तित्वात असून तो सर्वपरिचित आहे.
(२) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची मुख्य इमारत पुणे महानगरपालिकेच्या ग्रेड-१ हेरिटेज दर्जाची आहे. मात्र केंद्रिय पुरातत्व अथवा राज्य पुरातत्व विभागाच्या सूचीमध्ये समाविष्ट केलेली नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे जिल्ह्यात पंतप्रधान आवास योजनेंतर्गत घरकुले बांधण्याबाबत

**(४३) * २५१०९ ॲड.जयदेव गायकवाड, श्री.अनिल भोसले, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील बेघर, भिक्षेकर गृहातील बेघर, हाताने मैला उचलणारे आदिम जमाती, कायद्याने बंदमुक्त केलेले वेठबिगार यांच्यासाठी इंदिरा आवास योजनेचे नाव बदलून पंतप्रधान आवास योजना (ग्रामीण) असे केले असले तरी प्रशासकीय असहकार्य आणि पात्रतेच्या जाचक अटीमुळे खऱ्या लाभार्थ्यांपर्यंत या योजना अद्याप पोहचल्या नाहीत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पुणे जिल्ह्यात या योजनेंतर्गत ५ हजार घरकुले बांधण्याचे उद्दिष्ट देण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, आतापर्यंत या योजनेंतर्गत किती घरकुले बांधण्यात आली आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) नाही.
(२) नाही.

प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) अंतर्गत सन २०१६-१७ मध्ये पुणे जिल्ह्याकरिता ७६८१ घरकुलांचे उद्दिष्ट देण्यात आले आहे. सदरचे उद्दिष्ट आर्थिक सामाजिक व जात सर्वेक्षण-२०११ च्या माहितीच्या आधारे लोकसंख्येनुसार तालुका निहाय वाटप करण्यात आले असून तालुकास्तरावरुन ग्रामपंचायतील वाटप केले आहे.

(३) सामाजिक व जात सर्वेक्षण-२०११ च्या माहितीच्या आधारे लाभार्थी निवडीबाबतची प्रक्रिया प्रगती पथावर आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नाशिक विभागात जलयुक्त शिवार योजनेत मंजूर केलेल्या कामांना अतिरिक्त निधी मिळण्याबाबत**

**(४४) * २५६२७ डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक विभागात जलयुक्त शिवार योजनेत सन २०१६-१७ या वर्षासाठी मंजूर केलेली कामे पूर्ण करण्याकरिता जवळपास सहाशे कोटीचा निधी कमी पडत असल्याने गेल्या वर्षी झालेली कामे व त्यातून प्राप्त निधी पाहता, या वर्षाची कामे पूर्ण करण्याकरिता रुपये चारशे कोटी अतिरिक्त निधी मिळावा अशी मागणी विभागीय आयुक्त, नाशिक यांनी दिनांक ८ सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास मा. मुख्यमंत्री यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरचा निधी उपलब्ध करुन देण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) जलसंधारण विभागाच्या दि.१३/१०/२०१६ च्या शासन निर्णयान्वये नाशिक विभागास रु.१४०.८० कोटी निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात कुष्ठरोग्यांच्या संख्येत वाढ झाल्याबाबत**

**(४५) * २४०९४ श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.सुनिल तटकरे, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.आनंद ठाकूर, श्री.रामराव वडकुते, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात माहे मार्च, २०१५ ते मार्च, २०१६ रोजी घेण्यात आलेल्या सर्वेक्षणात १२ हजार ६१५ कुष्ठ रुग्ण आढळल्याचे सार्वजनिक आरोग्य विभागाचे आयुक्त यांनी माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान जाहिर केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यापैंकी मुंबई शहरात ३६० रुग्ण आढळले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील कुष्ठ रोग्यांचे उच्चाटन करण्याकरिता शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) राज्यात माहे मार्च, २०१५ ते मार्च, २०१६ कालावधीत एकुण १७३२० कुष्ठरुग्ण शोधून उपचाराखाली आणले होते. मार्च, २०१६ अखेर १०१०३ कुष्ठरुग्ण उपचाराखाली होते.
(२) मार्च, २०१५ ते मार्च, २०१६ या कालावधीत मुंबई शहरात ५३१ कुष्ठरुग्ण शोधून उपचाराखाली आणले होते. तसेच मार्च, २०१६ अखेर ३३९ रुग्ण उपचाराखाली होते.
(३) कुष्ठरोगासंबंधी रोगप्रतिबंधक उपायाकरीता कुठल्याही प्रकारची प्रतिबंधात्मक लस नाही. कुष्ठरोगास आळा घालण्याकरीता सर्वसाधारण आरोग्य सेवेमधील आरोग्य कर्मचारी, आशा वर्कर यांचेमार्फत घरोघर सर्वेक्षण करुन संशयित रुग्ण शोधून वैद्यकीय अधिकारी यांचेमार्फत रुग्णाचे लवकरात लवकर निदान करुन नियमीतपणे बहुविध औषधोपचार हा एकमेव उपाय असल्याने समाजातील लपून राहिलेल्या रुग्णांना लवकरात लवकर निदान करुन सर्व शासकीय व निमशासकीय दवाखान्यांमध्ये नियमितपणे मोफत बहुविध औषधोपचार देण्यात येतो.

केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार दरवर्षी विशेष कुष्ठरोग शोध मोहिमेचे आयोजन केले जाते. सर्वसामान्य जनतेला कुष्ठरोग विषयक शास्त्रीय ज्ञान प्राप्त होवून कुष्ठरुग्णाने स्वत:हून तपासणीसाठी जवळच्या आरोग्य केंद्रात यावे या करीता आरोग्य शिक्षण व जनजागृती कार्यक्रमांचे आयोजन केले जाते.

तसेच मोक्याच्या ठिकाणी प्रदर्शने, बॅनर्स, पोस्टर्स, होर्डिंग, भिंतीवरील म्हणी, हस्तपत्रिका वाटप करणे इ. उपक्रम घेतले जातात.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पालघर जिल्ह्यातील पंचायत व ग्रामपंचायत स्तरावरील**
**कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्या पूर्ण करण्याबाबत**

**(४६) * २४८५१ श्रीमती विद्या चव्हाण, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यातील पंचायत स्तरावरील तसेच ग्रामपंचायत स्तरावरील ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांचे प्रलंबित प्रश्न सोडविण्याकडे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (पालघर) दुर्लक्ष करत असल्याबाबत निवेदन समर्थन या संस्थेने दिनांक १ ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास मा. मंत्री (ग्रामविकास) यांना दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनातील मागण्यांचे स्वरूप काय आहे व त्यावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) याबाबत समर्थन या संस्थेने दिनांक १ ऑक्टोबर, २०१६ रोजी मा.मंत्री (ग्रामविकास) यांना निवेदन दिले हे खरे आहे.

(२) उपरोक्त दिनांक १ ऑक्टोबर, २०१६ रोजीच्या निवेदनासोबत महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत संघटना, जि.पालघर यांचे दिनांक २०/०६/२०१६ रोजीचे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पालघर यांना दिलेले निवेदन प्राप्त झालेले आहे. सदर दिनांक २०/०६/२०१६ रोजीच्या निवेदनान्वये ग्रामपंचायत कर्मचारी संघटनेच्या प्रतिनिधींनी बैठक घेणे, किमान वेतनापेक्षा कमी वेतन मिळणे, कर्मचाऱ्यांचे सेवापुस्तक व भविष्य निर्वाह निधी जमा करणे व १० टक्के ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांमधून होणाऱ्या भरतीची यादी तयार करताना अनियमितता होणे असे मुद्दे उपस्थित केलेले आहेत.

सदर मागण्यांबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पालघर यांनी दिनांक ११/०७/२०१६ रोजीच्या पत्रान्वये सर्व गट विकास अधिकारी यांना आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबत सूचना दिलेल्या आहेत. तसेच ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांची मूळ कागदपत्रे तपासून दिनांक ०१/०१/२०१६ रोजीची सुधारित ज्येष्ठता सूची तयार करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## परभणी व हिंगोली जिल्हयातील शासकीय रुग्णालयातील सिटीस्कॅन व सोनोग्राफी मशिन बंद असल्याबाबत

**(४७) * २६१६९ श्री.रामराव वडकुते :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी व हिंगोली जिल्हयात शासकीय रुग्णालयातील सिटीस्कॅन व सोनोग्राफी मशिन्स बंद आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मशिन्स बंद असल्यामुळे रुग्णांना बाहेरुन चाचण्या कराव्या लागल्याने गरीब रुग्णांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बंद असलेल्या मशिन्स त्वरित दुरुस्त करण्याबाबत किंवा नवीन मशिन्स खरेदी करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) अंशत: खरे आहे.

परभणी येथील सिटीस्कॅन मशिनचे आयुर्मान संपल्यामुळे व अति वापरामुळे सदर मशिन बंद पडत होती. त्यामुळे ती मशिन पीपीपी अंतर्गत उपजिल्हा रुग्णालय, मुखेड येथे स्थलांतरीत करण्यात आली आहे.

हिंगोली येथील सिटीस्कॅन मशिन नादुरुस्त झाल्याने बंद आहे. तर तेथील सोनोग्राफी मशिन चालू आहे. विभागातील सर्व वैद्यकीय उपकरणांच्या दुरुस्तीसाठीची निविदा प्रक्रिया प्रगतीत आहे.

(२) परभणी व हिंगोली येथील सिटीस्कॅन मशिन सद्य:स्थितीत बंद असले तरी रुग्ण कल्याण समितीच्या निधीमधून राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेंतर्गत उपलब्ध निधीमधून व राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत उपलब्ध अनुदानातून खाजगी सिटीस्कॅन सेंटरव्दारे रुग्णांना सेवा पुरविण्यात येत आहेत.

(३) हिंगोली येथील सिटीस्कॅनचे सुटे भाग नादुरुस्त झाल्याने ते खरेदी करण्याची कार्यवाही सुरु आहे. तद्नंतर सिटीस्कॅनची सुविधा लवकरात लवकर उपलब्ध करुन देण्यात येईल.

तसेच साईबाबा विश्वस्त सेवेमार्फत सिटीस्कॅन मशिन खरेदीसाठी अर्थसहाय्य प्राप्त होणार असून त्याअंतर्गत १६ आरोग्य संस्थासाठी सिटीस्कॅन मशिनची खरेदी करावयाचे प्रस्तावित आहे. त्यात परभणी जिल्हा रुग्णालयाचा समावेश असून आवश्यकता भासल्यास हिंगोली येथील जिल्हा रुग्णालयाचा सुध्दा त्यात समावेश करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील दुर्गम व नक्षलग्रस्त विभागात काम करणाऱ्या १२ अस्थायी डॉक्टरांचे मृत्यू झाल्याबाबत**

**(४८) * २३७१० श्री.नारायण राणे, श्री.आनंद ठाकूर, श्री.धनंजय मुंडे, श्री.हेमंत टकले, श्री.सुनिल तटकरे, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.हरिसिंग राठोड, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील दुर्गम आदिवासी व नक्षलग्रस्त विभागात अत्यंत प्रतिकुल परिस्थितीत काम करणाऱ्या आरोग्य विभागाच्या किमान १२ अस्थायी डॉक्टरांचे दुर्धर आजार वा अपघातामुळे मृत्यू झाल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर डॉक्टरांची नियुक्ती हंगामी/अस्थायी म्हणून करण्यात येत असल्याने त्यांच्या कुटूंबांना शासनाकडून कोणतीही आर्थिक मदत देण्यात येत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अस्थायी डॉक्टरांच्या कुटूंबाना आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे अंशत: खरे आहे.

राज्यात आतापर्यंत विविध कारणांनी मृत पावलेल्या अस्थायी वैद्यकीय अधिकाऱ्यांची एकुण संख्या १० आहे.

(२) हे खरे आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**बोईसर येथे कचरा व्यवस्थापन केंद्रासाठी मंजूरी मिळण्याबाबत**

**(४९) * २५६७४ श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोईसर (जि.पालघर) येथे कचरा व्यवस्थापन केंद्रासाठी एमआयडीसीने भूखंड उपलब्ध करुनही मंजूरी मिळालेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नागपूर येथील दिक्षाभूमी, चिंचोली (शांतीवन)**
**व ड्रॅगन पॅलसचा विकास करण्याबाबत**

**(५०) * २४४६१ श्री.प्रकाश गजभिये, अॅड.जयदेव गायकवाड, श्री.किरण पावसकर, श्री.अनिल भोसले, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.रामराव वडकुते, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर येथील दिक्षाभूमी, ड्रॅगन पॅलेस आणि चिंचोली भागांना जोडणाऱ्या नागपुरात प्रस्तावित असलेल्या बुध्दिस्ट सर्कीट केंद्रासाठी १०० कोटीचा निधी देण्याचा निर्णय माहे सप्टेंबर, २०१६ च्या दुसऱ्या सप्ताहात घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दिक्षाभूमी, चिंचोली (शांतीवन) व ड्रॅगन पॅलेसचा विकास करुन तिन्ही बौध्द स्थळांना 'अ' ग्रेड दर्जा देण्याबाबत, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच चिंचोली (शांतीवन) ते नागपूर असे मेट्रो रेल्वेचे जाळे विकसित करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल :** (१) या ठिकाणी स्वदेश दर्शन योजनेंतर्गत निधी मिळण्यासाठी केंद्रिय पर्यटन मंत्रालयाला सप्टेंबर, २०१६ मध्ये रुपये ९९.९९ कोटीचा प्रस्ताव सादर केला आहे.
(२) नागपूर येथील दिक्षाभूमी स्थळास दिनांक ८/३/२०१६ च्या शासन निर्णयान्वये "अ" दर्जा पर्यटन स्थळ म्हणून घोषित करण्यात आले आहे.

ड्रॅगन पॅलेसला पर्यटन स्थळाचा दर्जा देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असून चिंचोली (शांतीवन) व ड्रॅगन पॅलेसच्या विकासासाठी निधी मिळण्यासाठी केंद्रीय पर्यटन मंत्रालयास प्रस्ताव सादर केला आहे.

(३) चिंचोली (शांतीवन) ते नागपूर मेट्रो रेल्वे विकसित करण्याचा निर्णय झालेला नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**किरकवाडी-नांदेड (जि.पुणे) पाटबंधारे विभागाच्या जागेवर गावातील कचऱ्यावर प्रक्रिया करण्याच्या प्रस्तावाबाबत**

**(५१) * २५६५९ श्री.अनिल भोसले, श्री.जयवंतराव जाधव, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हयातील किरकवाडी-नांदेड परिसरातील पाटबंधारे विभागाच्या जागेवर गावातील कचऱ्यावर प्रक्रिया करण्याबाबतची मागणी तेथील लोकप्रतिनिधीनी मा.मुख्यमंत्री तसेच पुणे जिल्हयातील पालकमंत्री यांच्याकडे माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) व (२) नाही.

तथापि सदरची मागणी मुख्य कार्यकारी अधिकारी, पुणे जिल्हा परिषद यांनी त्यांचे पत्र क्र. क्रंजिप-पंचा/७/०१, दि. ४/१/२०१६ अन्वये जिल्हाधिकारी, पुणे यांना सादर केली आहे. जिल्हाधिकारी, पुणे यांचेमार्फत मागणी/प्रस्ताव जलसंपदा विभागास अद्‌याप सादर झालेला नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**उल्हासनगर (जि.ठाणे) येथील आरोग्य केंद्र व**
**शासकीय रुग्णालयातील गैरसोईबाबत**

**(५२) * २३५५० श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्रीमती विद्या चव्हाण, ॲड.निरंजन डावखरे, श्री.हेमंत टकले, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर : तारांकित प्रश्न क्रमांक २३३१९ ला दिनांक १ ऑगस्ट, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय मध्यवर्ती रुग्णालय, उल्हासनगर (जि.ठाणे) येथे डॉक्टरांचा अभाव, अस्वच्छता, बंद उपकरणे, शौचालयाची दुरवस्था अशा विविध समस्यांनी रुग्णांना व्यवस्थित उपचार मिळत नसून रुग्णालयाची दूरवस्था झाली असून परिसरात अस्वच्छतेमुळे दुर्गंधी पसरल्याने रुग्णांची गैरसोय होत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत जिल्हा शल्य चिकित्सक यांच्याकडे रुग्णांनी तसेच त्यांच्या नातेवाईकांनी माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान तक्रारी करुन सूध्दा कोणतीच कार्यवाही केली जात नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने रुग्णालयात रुग्णांना सर्व सुविधा तात्काळ उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे नाही.

(२) नाही. अशाप्रकारची कोणतीही तक्रार रुग्ण किंवा त्यांच्या नातेवाईकांकडून जिल्हा शल्य चिकित्सक, उल्हासनगर, यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झालेली नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**इंदिरा गांधी वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर येथे स्कॅनिंग व एम.आर.आय. मशिन सुविधा पुरविण्यासाठी निधीची तरतूद करण्याबाबत**

**(५३) * २५२१५ प्रा.अनिल सोले, श्री.मितेश भांगडिया :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इंदिरा गांधी वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर येथे स्कॅनिंग व एम.आर.आय. मशिनची खरेदी निधी अभावी प्रलंबित असल्याने सामान्य रुग्णांची गैरसोय होत असल्याचे दिनांक ३० सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर स्कॅनिंग व एम.आर.आय. मशिनच्या निधीकरीता धर्मादाय संस्थांकडे मागणी करण्याचे निर्देश अधिष्ठाता, इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर यांना देण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या रुग्णालयात स्कॅनिंग व एम.आर.आय. मशिन नसल्यामुळे रुग्णांची गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) सदर संस्थेमध्ये सी.टी. स्कॅन मशिन रुग्णसेवेसाठी उपलब्ध आहे. एमआरआयसाठी संस्थेमार्फत रुग्णांना नजीकच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर येथे पाठविण्यात येते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**पुळूज प्राथमिक आरोग्य केंद्र (ता.पंढरपूर, जि.सोलापूर) येथे डॉक्टरांची रिक्त पदे भरण्याबाबत**

**(५४) * २४४३३ श्री.प्रशांत परिचारक :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुळूज प्राथमिक आरोग्य केंद्र (ता.पंढरपूर, जि.सोलापूर) येथे डॉक्टरांची दोन्ही पदे सहा महिन्यापासून रिक्त असल्याने डॉक्टरांअभावी प्रसूती विभाग बंद असल्याचे दिनांक ६ ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुळूज प्राथमिक आरोग्य केंद्रांतर्गत सहा उपकेंद्र येत असून या परिसरातील अंदाजे चाळीस हजाराहून अधिक नागरिकांना विविध उपचारांसाठी दूरच्या रुग्णालयात जावे लागते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर रुग्णालयातील रिक्त पदे भरण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे नाही.

मात्र दोन्ही वैद्यकीय अधिकारी दिनांक ६/१०/२०१६ रोजी रजेवर होते. तथापि आरोग्य सहाय्यीका (एल.एच.व्ही.) व आरोग्य सेविका (ए.एन.एम.) उपस्थित होत्या. त्यामुळे प्रसुती विभाग बंद नव्हता.

तसेच आरोग्य संस्थामधील कार्यरत असलेले सर्व वैद्यकीय अधिकारी/कर्मचारी एकाच कालावधीत गैरहजर राहू नये याबाबत विभागाच्या दिनांक २५/११/२०१६ परिपत्रकान्वये सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.
(२) प्राथमिक आरोग्य केंद्र पुळूज अंतर्गत पाच उपकेंद्रे व पुळूज प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये रुग्णांना आरोग्य सेवा पुरविण्यात येत आहेत.
(३) प्राथमिक आरोग्य केंद्र पुळुज येथे एकूण २१ पदे मंजूर असून त्यापैकी १७ पदे भरलेली आहेत. ४ पदे रिक्त आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वसुरी (ता.वाडा, जि.पालघर) येथे रुग्णवाहिका उपलब्ध नसल्याने बालिकेचा मृत्यू झाल्याबाबत

**(५५) * २५९२० श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वसुरी (ता.वाडा, जि.पालघर) येथे रुग्णवाहिका न मिळाल्यामुळे लक्ष्मी राकेश यादव या एका महिन्याच्या बालिकेचा माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान मृत्यू झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कुडूस प्राथमिक आरोग्य केंद्रातील रुग्णवाहिका ८ दिवसांपासून बंद असल्याने सदर मुलीचा ऑक्सीजन काढून घेवून तीला वाडा येथे पाठविण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे, चौकशीच्या अनुषंगाने संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) दिनांक २९, सप्टेंबर, २०१६ रोजी प्रा.आ.कें. कुडूस येथे दुपारी या रुग्णास दाखल केले. त्यावेळी या रुग्णाची प्रकृती अतिगंभीर असल्याचे निदर्शनास आल्याने या रुग्णास तात्काळ उपाययोजना होण्यासाठी खाजगी वाहनाने नजीकच्या ग्रा.रु. येथे ऑक्सिजनसह संदर्भित केले तथापि या रुग्णाचा रस्त्यात मृत्यू झाला.
(२) हे अंशत: खरे आहे. उपरोक्त प्रसंगी प्राथमिक आरोग्य केंद्राची रुग्णवाहिका सामटा येथे मासिक लस साठा आणण्यासाठी गेली होती. तर प्राथमिक आरोग्य केंद्राला संलग्न असलेली १०८ क्रमांकाची रुग्णवाहिका टायर फुटल्याने बंद स्थितीत होती. त्यामुळे रुग्णाला खाजगी वाहनाने ऑक्सिजनसह संदर्भ सेवा देण्यासाठी ग्रामीण रुग्णालय, वाडा येथे नेण्यात आले व त्याचे भाडे प्रा.आ. केंद्राच्या रुग्णकल्याण निधीमधून देण्यात आले.
(३) तालुका आरोग्य अधिकारी यांच्यामार्फत चौकशी करण्यात आली असून, प्रा.आ.केंद्र कुडूस येथील वैद्यकीय अधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस देण्यात आली आहे. तसेच १०८ रुग्णवाहिकेचे टायर दिनांक ३०/९/२०१६ रोजी दुरुस्त करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## गोदावरी नदीवरील उच्च पातळी बंधाऱ्यांच्या बुडीत क्षेत्रातील संपादित जमिनीचा मावेजा अदा करण्याबाबत

**(५६) * २३६०२ श्री.अमरसिंह पंडित, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गोदावरी नदी पात्रातील जोगलादेवी, मंगरूळ, राजाताकली, लोणी सांगवी, हिराडपुरी सह इतर उच्च पातळी बंधाऱ्यांच्या बुडीत क्षेत्रातील संपादित जमिनीचा रुपये ३८५० लाखाचा मावेजा संबधित शेतकऱ्यांना माहे ऑक्टोबर, २०१६ पर्यंत प्राप्त झाला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे महामंडळ, औरंगाबाद यांनी त्यांच्या अखत्यारीतील सिंचन प्रकल्पांच्या सुमारे रुपये १२०० कोटी किंमतीचा भूसंपादन मावेजा मिळण्याची विनंती शासनाला केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मराठवाड्यातील प्रलंबित भूसंपादन मावेजा वाटपासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) अंशत: खरे आहे.

गोदावरी नदी पात्रातील आपेगाव, हिरडपुरी, जोगलादेवी, मंगरूळ, राजा टाकळी व लोणी सावंगी या ६ उच्च पातळी बंधारा क्षेत्रासाठी संपादित करावयाच्या एकूण १९३.१७ हेक्टर क्षेत्रापैकी १०४.३७ हेक्टर क्षेत्र संपादित करण्यात आले असून त्यापोटी रू. ८३९.५४ लक्ष मावेजा वाटप करण्यात आला आहे व रू. २१५.६७ लक्ष वाटप करणे प्रलंबित आहे. या व्यतिरिक्त परभणी व नांदेड जिल्ह्यातील इतर ९ बंधाऱ्याच्या बुडीत क्षेत्रातील संपादित करावयाच्या जमिनीचा अंतिम मावेजा वितरीत करण्यात आलेला आहे. उर्वरीत ३८६.१० हेक्टर क्षेत्राची भूसंपादन कार्यवाही सुरू असून कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर रू. ४११०.७३ लक्ष मावेजा वाटप करण्याचे नियोजन आहे.
(२) होय.
(३) व (४) राज्याच्या अर्थोपायाची स्थिती व मा.राज्यपाल महोदयांच्या निदेशानुसार मराठवाडा विभागास उपलब्ध होणारा निधी तसेच प्रकल्पाचे सद्यस्थितीनुसार प्राधान्यक्रम विचारात घेऊन निधी उपलब्ध करुन देण्यात येईल.

-----------------

### आर्णी (जि.यवतमाळ) येथे ट्रामा केअर युनिट स्थापन करण्याबाबत

**(५७) * २५०७४ श्री.ख्वाजा बेग, श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आर्णी (जि.यवतमाळ) येथे ट्रामा केअर युनिट स्थापन करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर विचाराधीन बाबीवरील शासनाचा अंतिम निर्णय झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) शासनस्तरावर सन २०११ च्या जनगणनेवर आधारीत जोड बृहत आराखडा करण्याची कार्यवाही सुरु आहे. सदर मागणी जोड बृहत आराखडा अंतिम करताना निकषानुसार विचारात घेतली जाईल.

-----------------

**संगम (ता.माळशिरस, जि.सोलापूर) येथील नीरा नदीवरील बंधाऱ्याच्या दुरुस्तीबाबत**

**(५८) * २५५५० श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संगम (ता.माळशिरस, जि.सोलापूर) येथील नीरा नदीवर बांधण्यात आलेल्या बंधाऱ्यांच्या दरवाज्यांच्या भिंती ढासळल्याने बंधारा व त्यावरील पुल वाहतुकीसाठी धोकादायक झाल्याचे माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर बंधाऱ्याची दुरुस्ती करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) अंशत: खरे आहे.

पुराच्या पाण्यामुळे बंधा-याचे दोन स्तंभ क्षतिग्रस्त झाले आहेत.

(२) बंधा-याच्या दुरुस्तीचे नियोजन असून त्यासाठी अंदाजपत्रक तयार करण्याचे काम क्षेत्रिय स्तरावर प्रगतीत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**धमधमी (ता.मालेगाव, जि.वाशिम) येथे वन विभागाच्या कर्मचाऱ्यांनी केलेली वृक्षतोड**

**(५९) * २५९५६ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धमधमी (ता.मालेगाव, जि.वाशिम) येथे आदिवासी समाजाच्या युवकाच्या शेतातील १०० सागवान वृक्षांची वन विभागाच्या कर्मचाऱ्यांनी तोड केल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंबंधीत मुख्य वनरक्षक, यवतमाळ व तहसिलदार, मालेगाव व पोलीस ठाणे जऊळका यांच्याकडे आदिवासी शेतमालकाकडून तक्रार करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी करुन संबंधित वन विभागाच्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) धमधमी (ता.मालेगाव, जि.वाशिम) येथे आदिवासी समाजाच्या युवकाच्या शेतातील १०० सागवान झाडांची तोड वन विभागाच्या कर्मचाऱ्यांनी केल्याचे खरे नाही.

(२) हे खरे आहे.

(३) प्रकरणी चौकशी करण्यात आली असुन त्यानुसार आदिवासी युवकाच्या शेतातील गट क्र.२३ ला दिलेले वृक्षतोड परवानगीमध्ये गट क्र. २१ व २४ चा बिगर परवाना वृक्षतोड करुन वाहतूक परवान्यासाठी प्रस्तावित करणेबाबत दोषी आढळलेले श्री.बी.के.चव्हाण, तत्कालीन वृक्ष अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी, वाशिम यांचेविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ चे कलम ८ नुसार दोषारोपपत्र बजावून त्यांचेविरुध्द विभागीय चौकशी सुरु केली आहे. तसेच प्रकरणी अनियमिततेकरीता जबाबदार असलेले पर्यवेक्षीय अधिकारी श्री.एम.बी.गांगुर्डे, तत्कालीन सहायक वनसंरक्षक (तेंदू), वाशिम यांचेविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ चे कलम ८ नुसार दोषारोपपत्र मान्यतेची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात ऑनलाईन रिटर्न बंद असल्याबाबत

**(६०) * २३५५२ श्री.जयंत पाटील, श्री.नरेंद्र पाटील, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.जयवंतराव जाधव, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.अमरसिंह पंडित, श्री.धनंजय मुंडे, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.प्रकाश गजभिये, श्री.रामराव वडकुते, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.आनंद ठाकूर, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात दिनांक १ एप्रिल, २०१६ पासून ऑनलाईन रिटर्न बंद असल्याने विक्रीकराची वसुली पूर्ण क्षमतेने होत नसल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, "सॅप" आधारीत कर महसूल व्यवस्थापन (टी आर एम) पध्दत विक्रीकर विभागात आणण्यासाठी एन.आय.आय.टी. कंपनीस वर्षभरापूर्वी कंत्राट देण्यात येऊन सुध्दा संबंधित कंपनीने कोणतीच कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मागील वर्षी विक्रीकरातून रुपये ७९ हजार कोटीचे उत्पन्न प्राप्त झाले असताना सन २०१६-१७ मध्ये रुपये ९० हजार कोटी वसुलीचे उद्दीष्ट साध्य होणार नसल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, ऑनलाईन यंत्रणा बंद असताना करदायित्व निश्चित करुन वसुली करण्याचे काम विक्रीकर विभागामार्फत योग्यरित्या होत नाही, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, रिटर्नची नविन ऑनलाईन पध्दत आणण्यात दिरंगाई करणाऱ्या दोषी अधिकाऱ्यांवर व कंपनीवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) नाही. वित्तीयवर्ष २०१६-१७ मध्ये २३ नोव्हेंबर, २०१६ विक्रीकर विभागामार्फत रुपये ५८५५८ कोटीची वसूली झाली असून गतवर्षाच्या उल्लेखित दिनांकापर्यंत झालेल्या वसूली पेक्षा ११.१६% वाढ आहे.

(२) एनआयआयटी कंपनीमार्फत कंत्राट दिल्यानंतर व्यापाऱ्याची नोंदणी तसेच व्यापाऱ्यांचे विवरण व करभरणा सॅप आधारित कर महसूल व्यवस्थापन संगणक पद्धतीवर घेण्यात येत आहे.

(३) नाही, वित्तीय वर्ष २०१६-१७ चे महसूल उद्दिष्ट साध्य करण्याचा सर्वोतोपरी प्रयत्न करण्यात येत आहे.

(४) नाही, ऑनलाईन यंत्रणा सुरु आहे. त्यामुळे करदायित्वाची निश्चिती करण्यात अडचण येणार नाही.

(५) लागू नाही.

-----------------

**परभणी जिल्हयातील मुळी बंधाऱ्याच्या दरवाजांची दुरुस्ती करण्याबाबत**

**(६१) * २४५२० श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्हयातील मुळी बंधाऱ्याच्या दरवाज्याची कामे पुर्ण न झाल्याने कोटयवधी लिटर पाणी वाहून गेल्याने त्या परिसरातील नागरीकांनी माहे सप्टेंबर-ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान आंदोलन करून निषेध व्यक्त केला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दरवाज्याच्या कामासाठी लागणारा निधी व यंत्रणा निश्चित करण्यासाठी तसेच पाण्याच्या नुकसानीबाबत संबंधीत अधिकारी/कर्मचारी यांची चौकशी करून त्यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय. हे अंशत: खरे आहे.

बंधाऱ्याच्या दरवाज्याची मूळ कामे वर्ष २०१२ मध्ये पूर्ण करण्यात आलेली आहेत, परंतु अतिवृष्टीमुळे उद्‌भवलेल्या पुराच्या पाण्याने दरवाजे क्षतीग्रस्त झाले आहेत.

(२) क्षतिग्रस्त द्वारांची दुरुस्ती निधीच्या उपलब्धतेनुसार पूर्ण करण्याचे प्रस्तावित आहे.

मुळी बंधाऱ्यास स्वयंचलित द्वारे ही प्रायोगिक तत्वावर (Pilot Basis) बसविण्यात आलेली होती, सन २०१६ च्या पावसाळा कालावधीत अतिवृष्टीमुळे उद्‌भवलेल्या पूर परिस्थितीत बंधाऱ्यांची द्वारे क्षतिग्रस्त झाली आहेत. त्यामुळे अधिकारी/कर्मचारी यांची चौकशी करुन कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**नगर जिल्हयातील शिक्षकांच्या आंतरजिल्हा बदलीबाबत**

**(६२) * २४१७५ श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आंतरजिल्हा बदली होत नाही म्हणुन नगर जिल्हयातील २६ शिक्षकांनी इच्छा मरणाची मुख्यमंत्र्यांकडे परवानगी मागितली असल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनेक वर्ष बाहय जिल्हयात नोकरी करूनही आंतरजिल्हा बदली होत नसल्यामुळे हे शिक्षक व त्यांचे कुटूंबीय व्यथित झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या शिक्षकांच्या आंतरजिल्हा बदलीसंदर्भात शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) व (२) अशा प्रकारचे निवेदन मा.मुख्य सचिव यांचे कार्यालयात दिनांक ८/८/२०१६ रोजी दिल्याचे आढळून आले आहे.

(३) व (४) दिनांक ३० सप्टेंबर, २०१४ व दिनांक ३० सप्टेंबर, २०१५ च्या ऑनलाईन संचमान्यतेस अनुक्रमे माहे नोव्हेंबर, २०१५ व एप्रिल, २०१६ मध्ये मान्यता मिळाली आहे. सद्यस्थितीत दिनांक ३० सप्टेंबर, २०१६ च्या ऑनलाईन संचमान्यतेची कार्यवाही सुरु आहे.

दिनांक ३० सप्टेंबर, २०१५ च्या शिक्षक संच मान्यतेमधील मंजूर पदानुसार अहमदनगर जिल्हा परिषदेकडील शिक्षक संवर्गाची बिंदुनामावली मान्यतेकरीता मा.सहा. आयुक्त, मागासवर्गीय कक्ष, नाशिक विभाग, नाशिक यांचेकडे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये सादर करण्यात आली आहे. बिंदुनामावली मंजूर झाल्यानंतर ना हरकत प्रमाणपत्र देण्यात आलेल्या बदली पात्र प्राथमिक शिक्षकांच्या आंतरजिल्हा बदलीबाबत कार्यवाही करण्यात येईल.

-----------------

## राज्यात स्मार्ट सिटीच्या धर्तीवर स्मार्ट ग्राम योजना राबविण्याबाबत

**(६३) * २३५१४ डॉ.अपूर्व हिरे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात स्मार्ट सिटीच्या धर्तीवर स्मार्ट ग्राम योजना राबविण्याच्या प्रस्तावावर शासनाचा विचार पुर्ण झाला आहे काय,

(२) असल्यास, योजनेचा प्रारुप आराखडा तयार करण्याची कार्यवाही पुर्ण झाल्यास योजनेचे सर्वसाधारण स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, सदर प्रस्ताव मंत्री मंडळापुढे सादर करण्यात आला आहे काय, मंत्रीमंडळाने कोणता निर्णय घेतला आहे, त्यानुषंगाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१), (२) व (३) राज्यातील सर्व ग्रामपंचायतींना विकास कार्यक्रमात सहभागी करुन घेण्याकरिता, यापूर्वी कार्यरत असलेली पर्यावरण संतुलित समृध्द ग्राम योजनेच्या सद्यस्थितीतील स्वरुपात व निकषात बदल करण्यात येऊन “स्मार्ट ग्राम” या नावाने नवीन योजना राबविण्याबाबतचा प्रस्ताव मा.मंत्रीमंडळ बैठकीस दिनांक ८/११/२०१६ रोजी सादर करण्यात आला होता. मा.मंत्रीमंडळाने सदरहू योजनेस मान्यता दिली असून, त्यानुसार योजनेबाबतचा शासन निर्णय दिनांक २१/११/२०१६ रोजी निर्गमित करण्यात आला आहे.

स्मार्ट ग्राम योजनेत शासनाने ठरवून दिलेल्या निकषांच्या आधारे, तालुका स्तरावर तसेच जिल्हा स्तरावर सहभागी ग्रामपंचायतींना गुणांकन देवून सर्वोच्च गुण प्राप्त ग्रामपंचायतींना तालुका स्मार्ट ग्राम व जिल्हा स्मार्ट ग्राम म्हणून घोषित करण्यात येणार आहे. यामध्ये तालुका स्मार्ट ग्राम ग्रामपंचायतींना रुपये १० लक्ष व जिल्हा स्मार्ट ग्रामपंचायतींना रुपये ४० लक्ष रोख स्वरुपात बक्षीस वितरण करण्यात येणार आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**म्हारळ (ता.कल्याण, जि.ठाणे) ग्रामपंचायतीमध्ये**
**मुद्रांक शुल्क अनुदानात गैरव्यवहार झाल्याबाबत**

**(६४) * २५९३३ श्री.सुजितसिंह ठाकूर :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) म्हारळ (ता.कल्याण, जि.ठाणे) ग्रामपंचायतीमध्ये मागील तीन वर्षात शासनाच्यावतीने मिळालेल्या मुद्रांक शुल्क अनुदानात रुपये एक कोटी सात लाखांचा गैरव्यवहार झाल्याचे माहे सप्टेबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन २०१२-१३ व २०१३-१४ या कालावधीमध्ये ग्रामपंचासतीस शासनाच्यावतीने रुपये २ कोटी २७ लाख ८९ हजार मुद्रांक शुल्क स्वरुपात अनुदान मिळाले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त मुद्रांक शुल्क अनुदान गैरव्यवहाराची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) अंशत: खरे आहे.
सदरची तक्रार ऑक्टोबर, २०१५ मध्ये प्राप्त झालेली आहे.
(२) सन २०१२-१३ मध्ये म्हारळ ग्रामपंचायतीस रक्कम रुपये १,१८,९२,९८८/- व सन २०१३-१४ मध्ये १,१०,८२,३४१ असे एकूण रुपये २,२९,७५,३२९/- इतके अनुदान ग्रामपंचायतीस वितरीत करण्यात आले आहे.
(३) होय.
चौकशी केली आहे. संबंधित दोषींवर प्रशासकीय कारवाई करण्यात आली असून फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## यवतमाळ जिल्हयात प्रधानमंत्री आवास योजनेत जाचक अटी घातल्याने लाभार्थी घरकुलांपासून वंचित राहिल्याबाबत

**(६५) * २४६८० श्री.हरिसिंग राठोड, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्ह्यात १ लाख २० हजार ८१८ नागरिक बीपीएल यादीच्या प्रतिक्षा यादीत असणे, मात्र आता हे सर्व रद्द करुन केंद्र शासनाने जीपीएल (जनरेटेड प्रायोरीटी लिस्ट) योजना प्रस्तावित केली असल्याने केवळ ६२ हजार ५५६ कुटुंबांचा समावेश असल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जाचक अटी घालून सदर यादीतून नावे वगळण्याचे निर्देश ग्रामसभांना दिले आहेत, त्यामुळे ५७ हजार लाभार्थी घरकुलांपासून वंचित राहणार आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने निर्णय घेऊन प्रधानमंत्री आवास योजनेतील जाचक अटी रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.

(२) नाही.

(३) प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार राबविण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## येवल्याच्या मुक्तीभूमीला ब वर्ग पर्यटनस्थळाचा दर्जा मिळणेबाबत

**(६६) * २३६१२ श्री.जयवंतराव जाधव :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) येवल्याच्या मुक्तीभूमीला ब वर्ग पर्यटनस्थळाचा दर्जा मिळणेसाठी जिल्हाधिकारी, नाशिक यांनी दिनांक १९ ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे प्रस्ताव पाठविलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येवल्याच्या मुक्तीभूमीवर येणाऱ्या पर्यटकांना व भाविकांना जास्तीत जास्त सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी या स्थळाचा ब वर्ग पर्यटनस्थळामध्ये समावेश करण्याची स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १ सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल :** (१) येवल्याच्या मुक्तीभूमीला "ब" वर्ग पर्यटनस्थळाचा दर्जा देण्याबाबतचा जिल्हाधिकारी, नाशिक यांनी ग्रामविकास विभागास पाठविलेला प्रस्ताव ग्रामविकास विभागाकडून पर्यटन विभागास नुकताच प्राप्त झाला आहे.

(२) स्थानिक लोकप्रतिनिधींचे निवेदन जिल्हाधिकारी यांना प्राप्त झालेले आहे.

(३) याबाबतचा प्रस्ताव विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

**राज्यात एमबीबीएस आणि बीडीएस या वैद्यकीय अभ्यासक्रमांकरिता नीट परिक्षा देणे अनिवार्य केल्याबाबत**

**(६७) * २४८०६ श्री.अमरिशभाई पटेल, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे : तारांकित प्रश्न क्रमांक २०१०० ला दिनांक २१ जुलै, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात एमबीबीएस आणि बीडीएस या वैद्यकीय अभ्यासक्रमांकरिता नीट परिक्षा देणे अनिवार्य करण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील आयुर्वेदिक, होमिओपॅथिक, फिजिओथेरपी, स्पीच थेरपी व इतर वैद्यकीय अभ्यासक्रमांचे प्रवेश कुठल्या प्रवेश परीक्षेच्या आधारे होणार हे वैद्यकीय शिक्षण विभागाने निश्चित केले नसल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, आयुर्वेदिक, होमिओपॅथिक औषधनिर्माण शास्त्राचे प्रवेश सन २०१७ च्या शैक्षणिक वर्षात स्वतंत्र सीईटीद्वारे करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) वैद्यकीय व दंत अभ्यासक्रमाप्रमाणेच उर्वरित सर्व आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमाच्या प्रवेशासंदर्भात सन २०१७ करिता प्रवेश प्रक्रिया ही नीटद्वारे करण्याबाबतची कार्यवाही शासनस्तरावर सुरु आहे. तसेच, औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाचे २०१७ चे प्रवेश हे राज्याच्या सामाईक प्रवेश परीक्षेमार्फत (CET) करण्यात येणार आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## रत्नागिरी जिल्ह्यातील साकवांची दुरुस्ती करण्याबाबत

**(६८) * २३९२९ ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सन २००६-०७ मध्ये रत्नागिरी जिल्ह्यातील सुमारे ६३४ साकव अत्यंत धोकादायक असल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यानुसार जिल्ह्यातील चिपळूण तालुक्यातील १५५ पैकी १०८ साकव, मंडणगड तालुक्यातील ५६ पैकी २७, दापोली तालुक्यातील ७७ पैकी ३१, खेड तालुक्यातील १५४ पैकी ९५, गुहागरमध्ये ८५ पैकी ७०, संगमेश्वर तालुक्यात १६० पैकी ३२, रत्नागिरीत १३५ पैकी ९१, तसेच राजापूर आणि लांजा तालुक्यातील सर्वाधिक साकव धोकादायक स्थितीत असल्याचे दिनांक २२ सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या साकवाच्या दुरुस्तीसाठी रत्नागिरी जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाने शासनाकडे रक्कम रुपये १५ कोटी ७७ ची मागणी केली असल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, रत्नागिरी जिल्ह्यातील साकवांच्या दुरुस्तीसाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) नाही. हे खरे नाही.

रत्नागिरी जिल्हा परिषदेकडील एकूण १०९२ साकवांपैकी ६३४ साकव नादुरुस्त स्थितीत आहेत. त्यापैकी ३१ साकव धोकादायक स्थितीत आहेत.
(२) नाही. हे खरे नाही.

रत्नागिरी जिल्हयातील साकवांची तालुकानिहाय सद्यस्थिती खालीलप्रमाणे आहे.

| **तालुका** | **एकूण साकव** | **नादुरुस्त साकव** | **नादुरुस्त पैकी धोकादायक साकव** |
|---|---|---|---|
| मंडणगड | ५६ | २७ | ४ |
| दापोली | ७७ | ३१ | १ |
| खेड | १५४ | ९५ | २ |
| चिपळूण | १५५ | १०८ | ७ |
| गुहागर | ८५ | ७० | ५ |
| संगमेश्वर | १६० | ३२ | १ |
| रत्नागिरी | १३५ | ९१ | ५ |
| लांजा | १३१ | ८७ | ५ |
| राजापूर | १३९ | ९३ | १ |
| **एकूण** | **१०९२** | **६३४** | **३१** |

(३) होय, हे खरे आहे.
(४) मा. मंत्री वित्त व नियोजन यांच्या अध्यक्षतेखाली रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्हयातील साकव दुरुस्ती संदर्भात बैठक घेण्यात आली होती. सदर बैठकीतील निर्णयाच्या अनुषंगाने साकव देण्याकरीता पुरवणी मागणी सार्वजनिक बांधकात विभागाने प्रस्तावित केली आहे.

-----------------

## मुंबईसह कोकणातील सर्व किनाऱ्यांवर पर्यटकांच्या सुरक्षेबाबत उपाययोजना करण्याबाबत

**(६९) * २५३५४ ॲड.राहुल नार्वेकर, श्री.किरण पावसकर, श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले, श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईसह कोकणातील सर्व किनाऱ्यांवर पर्यटकांच्या सुरक्षेबाबत उपाययोजना करण्याच्या सूचना राज्याच्या पर्यटन व सांस्कृतिक विभागाने दिल्या आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित विभागातील बहुसंख्य शासकीय यंत्रणांनी फक्त धोक्याच्या सूचना देणारे फलक किनाऱ्यावर लावले असून बऱ्याच ठिकाणी फलक लावण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल :** (१) होय.

(२) नाही.

शासनाने ठरवून दिलेल्या पालघर, रत्नागिरी, रायगड व सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सर्व समुद्र किनाऱ्यांवर (बिचेसवर) माहिती फलक लावण्यात आलेले आहेत. तसेच मुंबईतील गिरगांव, दादर, जुहू, आक्सा, वर्सोवा व गोराई या समुद्रकिनाऱ्यांवरही माहिती फलक लावण्यात आले आहेत. याशिवाय वॉच टॉवर, सायरन, जीवरक्षक, कचरापेट्या इत्यादी व्यवस्थाही बहुतांश समुद्र किनाऱ्यावर करण्यात आलेली आहे. याप्रकरणी मा.उच्च न्यायालयात दाखल जनहित याचिका (PIL) न्यायप्रविष्ट आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## शासनाने रेडिओलॉजिस्ट डॉक्टरांची समस्या सोडविण्याबाबत

**(७०) * २३५४२ श्री.संजय दत्त :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील प्रसूतीपूर्व लिंग निदान प्रतिबंधक कायद्याचा योग्य पध्दतीने वापर होत नसल्याने निर्दोष डॉक्टरांना त्रास सहन करावा लागत असल्याने या कायदयाच्या विरोधात राज्यातील ४ हजार रेडिओलॉजिस्ट डॉक्टरांनी दिनांक १ सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास संप केला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) राज्यातील प्रसूतीपूर्व लिंग निदान प्रतिबंधक कायद्याचा योग्य पध्दतीने वापर होत आहे. निर्दोष डॉक्टरांना त्रास सहन करावा लागत नाही. तसेच रेडिओलॉजिस्ट डॉक्टरांनी दिनांक १ सप्टेंबर, २०१६ रोजी संप केला होता, हे खरे आहे.

(२) याबाबत राज्य शासनाच्या कक्षेतील बाबींच्या अनुषंगाने Standard Operating Procedure (SOP) तयार करण्याचे काम सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## १४ व्या वित्त आयोगांतर्गत स्थानिक स्वराज्य संस्थाच्या जिल्हा परिषद व पंचायत समिती यांना वगळून संपूर्ण निधी ग्रामपंचायत स्तरावर देण्याबाबत

**(७१) * २५८०२ श्री.गोपिकिशन बाजोरीया :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) १४ व्या वित्त आयोगांतर्गत स्थानिक स्वराज्य संस्थाच्या जिल्हा परिषद व पंचायत समिती यांना वगळून संपूर्ण निधी ग्रामपंचायत स्तरावर देण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, १३ व्या वित्त आयोगांतर्गत जिल्हापरिषद १० टक्के, पंचायत समिती २० टक्के व ग्रामपंचायत ७० टक्के याप्रमाणे देण्यात येत असतानाही १४ व्या वित्त आयोगांतर्गत संपूर्ण निधी ग्रामपंचायत स्तरावर देण्यामागची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, याबाबत फेरविचार करुन संपूर्ण निधी पंचायत समिती व जिल्हा परिषद यांना देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) चौदावा वित्त आयोगांतर्गत केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार संपूर्ण निधी केवळ ग्रामपंचायत स्तरावर उपलब्ध करावयाचा आहे. त्यानुसार राज्यस्तरावर अंमलबजावणी होणे बंधनकारक असून केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचना विचारात घेऊन चौदाव्या वित्त आयोगाचा निधी ग्रामपंचायतस्तरावर वितरणाबाबत धोरणात्मक निर्णय शासनाने घेतला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर आयुर्वेद महाविद्यालयातील रुग्णालयात आकस्मित विभागाच्या प्रलंबित प्रस्तावाबाबत

**(७२) * २५४८९ श्री.मितेश भांगडिया :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर आयुर्वेद महाविद्यालयातील रुग्णालयात रुग्णांकरीता आकस्मित विभागाचा प्रस्ताव शासनाकडे गत दोन वर्षांपासून प्रलंबित असल्याचे दिनांक २६ सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर महाविद्यालयात बालरोग विभागासह अनेक विभागाच्या अध्यापक पदाला अद्याप मंजूरी प्राप्त नसल्यामुळे ही सर्व पदे रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासकीय नियमानुसार दोन आकस्मित विभागामध्ये किमान ०१ किलोमीटर पेक्षा जास्त अंतर असणे आवश्यक असून शासकीय वैद्यकीय महाविद्यालय रुग्णालयात व आयुर्वेद महाविद्यालय व रुग्णालयामध्ये एक किलोमीटर पेक्षा जास्त अंतर आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, महाविद्यालयातील रुग्णालयात रुग्णांकरिता आकस्मित विभागाचा प्रलंबित प्रस्तावास त्वरीत मंजूर देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रस्ताव प्रलंबित नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नंदूरबार जिल्हयातील आरोग्य अधिकाऱ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत**

**(७३) * २४६७१ श्री.चंद्रकांत रघुवंशी, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नंदूरबार येथील आदिवासी जिल्हयात आरोग्य अधिकाऱ्यांची पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गेल्या ६ महिन्यांपासून नंदूरबार जिल्हा परिषदेतही कायमस्वरुपी जिल्हा आरोग्य अधिकारी नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन जिल्हयातील आरोग्य विभागाची रिक्त पदे भरण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे अंशत: खरे आहे,

नंदुरबार जिल्हयामध्ये महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-अ ची २१० पदे मंजूर असून त्यापैकी १५४ पदे भरलेली व ५६ पदे रिक्त आहेत.

(२) होय,

तथापि, जिल्हा परिषद नंदूरबार येथील जिल्हा आरोग्य अधिकारी हे पद दिनांक १७ ऑक्टोबर, २०१६ रोजी भरण्यात आले आहे.

(३) महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-अ (ग्रेड पे.रुपये ६६००) संवर्गाची रिक्त पदे नामनिर्देशनाने व पदोन्नती भरण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

वैद्यकीय अधिकारी गट-अ (ग्रेड पे.रुपये ५४००) संवर्गाची रिक्त पदे संबंधित जिल्हाधिकारी यांच्यामार्फत भरण्याबाबतची कार्यवाही जिल्हास्तरावरुन करण्याबाबत कळविण्यात आले आहे

तसेच गट-क व गट-ड ची रिक्त पदे भरण्याबाबत कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत शेततळे ग्रामपंचायतीमार्फत घेण्याच्या प्रस्तावाबाबत

**(७४) * २५५९४ श्री.आनंदराव पाटील, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर : तारांकित प्रश्न क्रमांक १६०१० ला दिनांक १८ मार्च, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेंतर्गत ग्रामपंचायतीकडून १५x१५x३ मी. आकारमानाचे शेततळे करण्याची परवानगी दिनांक २५ सप्टेंबर, २०१५ रोजीच्या शासन निर्णयानुसार दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उल्लेखित आकारमानाचे शेततळे अत्यंत लहान व उपयोगक्षम नसल्यामुळे किमान ३०X३०X३ मी. आकारमानाचे शेततळे करण्याची परवानगी ग्रामपंचायतीला देण्याची मागणी लोकप्रतिनिधीनी दिनांक २८ सप्टेंबर, २०१५ रोजी शासनास केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सातारा, सांगली व सोलापूर जिल्ह्यातील अनेक तालुके सतत दुष्काळग्रस्त असून सिंचन सुविधा वाढविणे आणि मजुरांना तत्परतेने काम उपलब्ध करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल :** (१) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत शेततळ्यांची कामे ग्रामपंचायत/यंत्रणामार्फत घेण्यास शासन निर्णय दिनांक १४ सप्टेंबर, २०१५ अन्वये मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार ग्रामपंचायतीमार्फत छोट्या आकारमानांच्या शेततळ्यांची कामे (१०X१०X३ मी., १५X१०X३ मी., व १५X१५X३ मी.) अनुज्ञेय करण्यात आली आहेत.

(२) व (३) लोकप्रतिनिधींनी दिनांक २८ सप्टेंबर, २०१५ च्या निवेदनाद्वारे, ग्रामपंचायतीमार्फत किमान ३०X३०X३ मी. आकारमानाचे शेततळे करण्याची परवानगी देण्याबाबत मागणी केली आहे. त्यानुसार महात्मा गांधी नरेगा योजनेंतर्गत मोठ्या आकारमानाची शेततळे ग्रामपंचायतीकडून घेण्याबाबत शासन निर्णय दिनांक १३ जुलै, २०१६ अन्वये सूचना देण्यात आल्या आहेत.

दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर “मागेल त्याला शेततळे” ही योजना शासनाने दिनांक १७ फेब्रुवारी, २०१६ च्या शासन निर्णयान्वये जाहीर केली आहे. त्याचप्रमाणे महात्मा गांधी नरेगाअंतर्गत शेततळ्यांची कामे अनुज्ञेय आहेत. सातारा, सांगली व सोलापूर जिल्हयांमध्ये कामांचे शेल्फ तयार ठेवण्यात आले असून, कामाची मागणी होताच कामे उपलब्ध करुन देण्याची तजवीज करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मेळघाट (जि.अमरावती) येथे बालमृत्यू आणि मातामृत्यू यांची संख्या नियंत्रणात आणण्याबाबत

**(७५) * २४७४६ आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.रामहरी रुपनवर, प्रा.अनिल सोले, श्री.मितेश भांगडिया, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.संजय दत्त, श्री.आनंदराव पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मेळघाट (जि.अमरावती) येथे माहे एप्रिल ते जून, २०१६ या कालावधीत ११९ उपजत बालकाचा मृत्यू व १० मातामृत्यू झाल्याचे दिनांक २५ जुलै, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच राज्याच्या आदिवासी भागात गेल्या वर्षभरात कुपोषणाने माता व मुलांचे आठ हजार मृत्यू झाल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मागील दहा वर्षात गेल्या तीन महिन्यात मृत्यूमुखी पडलेल्या बालकांची संख्या सर्वाधिक आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, बालमृत्यूची संख्या नियंत्रणात आणण्यासाठी मेळघाटातील डॉक्टरांची संख्या वाढविणे, पोषण आहाराचा दर्जा सुधारणे, स्थलांतरितांना रोजगार मिळवून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) अंशत: खरे आहे.

मेळघाट (जि. अमरावती) येथे माहे एप्रिल ते जून, २०१६ या कालावधीत ५८ अर्भक मृत्यू, २३ बाल मृत्यू (१ ते ६ वर्ष), २५ उपजात मृत्यू व ८ मातामृत्यू झाले आहेत.

(२) हे खरे नाही.

राज्याच्या आदिवासी भागात सन २०१५-२०१६ या वर्षामध्ये मातामृत्यू ३०६ व बाल मृत्यू ६५८९ इतके झालेले आहेत. हे मृत्यू कुपोषणाने झालेले नसून विविध आजारांनी झालेले आहेत.

बाल मृत्यू हे सर्वसाधारणपणे कमी दिवसांचे बाळ, जन्मत कमी वजन, न्युमोनिया व जंतू दोष इत्यादी कारणांनी झालेले आहेत तर मातामृत्यू हे प्रसूती पश्यात रक्तस्त्राव, एक्लेम्पशिया व जंतू दोष इत्यादी कारणानी झालेले आहेत.

(३) हे खरे नाही.

माहे जून ते ऑगस्ट २०१६ हया ३ महिन्यांमध्ये ९५५ बालमृत्यू झालेले असून ते गेल्या १० वर्षात याच ३ महिन्यामध्ये झालेल्या बालमृत्यू पेक्षा कमी आहेत.

(४) या विभागातर्फे बालमृत्यू रोखण्यासाठी प्रभावीपणे योजना राबविल्या जातात. तसेच उपजिल्हा रुग्णालय धारणी, ग्रामीण रुग्णालय चुरणी व ग्रामीण रुग्णालय चिखलदरा येथे डॉक्टरांच्या नेमणुका करण्यात आल्या आहेत.

राष्ट्रीय आरोग्य अभियानातुन स्पेशल फोकस अंतर्गत स्त्री रोग तज्ञ व बधिरीकरण तज्ञ तसेच बिगर आदिवासी क्षेत्रातील बालरोग तज्ञांना आदिवासी क्षेत्रातील वरील तीन रुग्णालयांमध्ये आळीपाळीने प्रतिनियुक्ती देण्यात येते.

बालकांना देण्यात येणारा पोषण आहार हा ठरवून दिलेल्या निकषानुसार व दर्जानुसार देण्यात येतो.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यात प्रत्येक जिल्हयात सार्वजनिक-खाजगी सहभागातून वैद्‌यकीय महाविद्‌यालय सुरु करण्याचा निर्णयाबाबत**

**(७६) * २४१०२ श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.सुनिल तटकरे, श्री.रामराव वडकुते, श्री.सतिश चव्हाण, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.अनिल भोसले, श्री.जयवंतराव जाधव, श्री.प्रकाश गजभिये :** सन्माननीय **वैद्‌यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात प्रत्येक जिल्हयात सार्वजनिक-खाजगी सहभागातून वैद्‌यकीय महाविद्‌यालय सुरु करण्याचा निर्णय घेण्यात आलेला असूनही अद्‌याप वैद्‌यकीय महाविद्‌यालय सुरु करण्यात आलेली नाहीत, हे खरे आहे काय,

(२) तसेच ग्रामीण भागातील गरीब होतकरु विद्यार्थ्यांना वैद्यकीय सेवेचा लाभ घेता यावा म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) हे अंशत: खरे आहे.

राज्यात ज्या जिल्हयात शासकीय वैद्यकीय महाविद्यालये अस्तित्वात नाही अशा जिल्हयांत खाजगी भागीदारीतून आरोग्य सेवा संचालनालयाच्या अधिपत्याखालील जिल्हा रुग्णालयास संलग्नित वैद्यकीय महाविद्यालय स्थापन करण्याचे शासनाच्या विचाराधीन आहे. याअनुषंगाने शासकीय रुग्णालये व खाजगी सहभाग (खाजगी संस्था/व्यक्ती/स्वयंसेवी संस्था) यांच्यामध्ये सामंजस्य करार (MOU) करण्याबाबतची कार्यवाही सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत सुरु आहे.
(२) केंद्र शासनामार्फत जिल्हा सामान्य रुग्णालयाच्या श्रेणीवर्धनाकरिता अनुदान प्राप्तीसाठी उपयोग करुन सदरची योजना कार्यान्वित करण्याबाबत कार्यवाही करण्यात येणार आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे कलमपाडा (ता.मोखाडा, जि.पालघर) येथे अपुरा पोषण आहार व बालरोग तज्ञ नसल्याने बाळाचा मृत्यू झाल्याबाबत

**(७७) * २४८५९ श्रीमती विद्या चव्हाण, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे कलमपाडा (ता.मोखाडा, जि.पालघर) येथे दिनांक ३० ऑगस्ट, २०१६ रोजी सागर वाघ या अडिच वर्षाच्या बाळाला ग्राम बाल विकास केंद्र बंद झाल्यामुळे पोषण आहार दिला जात नसल्याने व मोखाडा ग्रामीण रुग्णालयांत बालरोग तज्ञ नसल्याने योग्य उपचार मिळाले नसल्यामुळे त्याचा मृत्यू झाल्याचे दिनांक ३ सप्टेंबर, २०१६ रोजी किंवा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच पालघर जिल्हयातील काही तालुक्यांमध्ये असलेल्या ग्रामीण रुग्णालयामध्ये बालरोग तज्ञ नसल्यामुळे अतितीव्र सॅम-१४५६ आणि तीव्र मॅम-५८६४ कुपोषित बाळांना योग्य उपचार मिळत नाहीत. ग्राम बाल विकास केंद्रे बंद असल्यामुळे पोषण आहार मिळत नसल्याचे दिनांक ३ सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) मौजे कळमवाडी खोच (ता.मोखाडा जि.पालघर) येथे दिनांक ३० ऑगस्ट, २०१६ रोजी सागर वाघ अडीच वर्षाच्या बाळाचा मृत्यू भुकबळीने व ग्राम बालविकास केंद्र बंद असल्यामुळे झालेला नसुन क्षयरोगामुळे मृत्यू झालेला आहे.

मृत्यूचे कारण - Fulminant pulmonary TB due to Septicemla)

(२), (३) व (४) जिल्हास्तरावरुन उपलब्ध नियमित बालरोग तज्ञ तसेच मुंबईतील जसलोक, हिंदुजा, वाडिया, ग्लोबल व सुर्या हॉस्पिटल व खाजगी रुग्णालयातील बालरोग तज्ञ मार्फत उपजिल्हा रुग्णालय, ग्रामीण रुग्णालय व प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावर आरोग्य शिबिरांचे नियोजन करण्यात आले असून याद्वारे सॅम व मॅम श्रेणीतील तसेच इतर आजारी मुलांची आरोग्य तपासणी करुन आवश्यक ते उपचार दिले जातात.

एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत अंगणवाडीतील ६ महिने ते ३ वर्ष वयोगटातील बालके, गर्भवती स्त्रिया व स्तनदा माता, तीव्र कमी वजनाची बालके, तसेच किशोरवयीन मुली यांना घरपोच आहार (THR) व ३ वर्षे व ६ वर्षे वयोगटातील लाभार्थी यांना गरम ताजा आहाराचा पुरवठा स्थानिक स्वयंसहाय्यता महिला बचतगट/ महिला मंडळ, तसेच महिला संस्था यांचेमार्फत नियमितपणे करण्यात येत आहे.

-----------------

## शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर येथील निवासी डॉक्टर गरीब रुग्णांची फसवणूक करीत असल्याबाबत

**(७८) * २३७१२ श्री.नारायण राणे :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय (मेडिकल) नागपूर येथील काही निवासी डॉक्टर हे गरीब रुग्णांची फसवणूक करीत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मेडिकल, मेयोमध्ये अशा लुटारु निवासी डॉक्टरांची एक टोळी निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त रुग्णालयात गरीब रुग्णांची होणारी फसवणूक व होणारी गैरसोय रोखण्याबाबत तसेच फसवणूक करणाऱ्या निवासी डॉक्टरांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) हे खरे नाही, तथापि अशा आशयाची बातमी वृत्तपत्रात प्रसिध्द झाली होती.
(२) हे खरे नाही.
(३) सदर प्रकरणी स्थानिक वृत्तपत्रात प्रसारित झालेल्या बातमीच्या अनुषंगाने संस्थास्तरावरुन चौकशी समिती नेमण्यात आली होती. सदर समितीने सादर केलेल्या अहवालानुसार उक्त प्रकरणात तथ्य आढळून आले नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पालघर व ठाणे जिल्ह्यात कुपोषणाच्या गंभीर समस्येवर उपाययोजना करण्याबाबत

**(७९) * २३७२५ श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सुनिल तटकरे, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.अनिल भोसले, श्री.जयवंतराव जाधव, श्री.ख्वाजा बेग, श्री.आनंद ठाकूर, श्री.रविंद्र फाटक, श्री.नारायण राणे, श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सुजितसिंह ठाकूर, आर्कि.अनंत गाडगीळ : तारांकित प्रश्न क्रमांक १९४८९ ला दिनांक १८ जुलै, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर, ठाणे या जिल्हयांसह राज्याच्या विविध भागात कुपोषणाची गंभीर समस्या निर्माण झालेली असून हजारो बालके कुपोषणाने बाधित आहेत व गेल्या वर्षभराच्या काळात कुपोषणाचे सुमारे १८ हजार बळी पडले, याप्रकरणी आढावा घेण्यासाठी मा.राज्यपाल महोदयांनी दिनांक १४ सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास सर्व संबंधितांची बैठक आयोजित करुन शासनास निदेश दिले व दिनांक २० सप्टेंबर, २०१६ रोजी सर्व संबंधितांची बैठक घेऊन कृती आराखडा तयार करण्याचे निदेश दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) तसेच राज्यात कुपोषणाची समस्या व त्यामुळे राज्यात झालेले बालमृत्यू याबाबत राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाने दिनांक १४ सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास शासनास नोटीस बजावून विचारणा केलेली आहे, तसेच याप्रकरणी डॉ.बंग व डॉ.आमटे यांनी सदर प्रकरणाबाबत प्रखर मोहिम हाती घेण्याची शासनाला विनंती केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच पालघर जिल्हयातील मोखाडा, जव्हार, वाडा व विक्रमगड तालुक्यात माहे एप्रिल, २०१६ पासून सुमारे ६०० बालके कुपोषणाने मृत्यू झाले असून जव्हार-मोखाडा येथे ९४७ बालके कुपोषणायुक्त असल्याचे तसेच सहा हजार बालके तीव्र व अतितीव्र असल्याचे शासनाच्या निदर्शनास आल्याने सदर तालुक्यातील ५ वर्षे वयापर्यंतच्या सर्व बालकांचे सर्वेक्षण करुन तीव्र व अतितीव्र कुपोषित मुलांची यादी अद्यावत करण्याचे आदेश शासनाने दिल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(४) तसेच, नेरळ (ता.कर्जत, जि.रायगड) येथील आदिवासी भागात ६६ कुपोषित बालके आढळून आली व ० ते ५ वयोगटातील ३ बालकांचा आणि जन्मत: ३६ बालकांचा मृत्यू झाल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) मा. राज्यपाल यांनी दिनांक १४ सप्टेंबर, २०१६ रोजी संबंधितांची बैठक घेऊन कृती आराखडा तयार करण्याचे निर्देश दिले आहेत.

पालघर व ठाणे जिल्हयात १८ हजार बालके कुपोषणाने दगावली नसून पालघर जिल्हयात माहे एप्रिल, २०१६ ते ऑगस्ट, २०१६ या पाच महिन्याच्या कालावधीत २५४ बालकांचा (०-१ वर्ष-१९५ व १ ते ६ वर्ष-५९) तर ठाणे जिल्हयात एप्रिल २०१६ ते सप्टेंबर २०१६ या सहा महिन्याच्या कालावधीत ८१ बालकांचा (०-१ वर्ष-५७ व १ ते ६ वर्ष-२४) मृत्यू झालेले आहेत. सदर बालमृत्यू हे कुपोषणाने झालेले नसुन विविध आजार/कारणांमुळे झालेले आहे.

पालघर जिल्हयात माहे ऑक्टोबर, २०१६ अखेर १८८५९८ बालकांपैकी मध्यम कमी वजनाची ३८३६१ व तीव्र कमी वजनाची ८६७० असे एकुण ४७०३१ कमी वजनाची मुले आढळुन आलेली आहेत. त्यामधील १४०२ सॅम व ६२६५ मॅम एकुण ७६६७ बालके आढळून आलेली आहेत.

(२) राज्यात कुपोषणाची समस्या व त्यामुळे राज्यात झालेले बालमृत्यू याबाबत राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाने दिनांक १४ सप्टेंबर २०१६ रोजी व त्यानुसार शासनास नोटीस बजावून विचारणा केली आहे.

(३) माहे एप्रिल, २०१६ ते ऑगस्ट, २०१६ पर्यंत मोखाडा, जव्हार, वाडा व विक्रमगड तालुक्यात ० ते ६ वर्ष वयाच्या बालकांचे १४७ बालमृत्यू झाले आहेत. सदर बालमृत्यू हे कुपोषणाने झालेले नसून विविध आजार/कारणांमुळे झालेले आहेत.

पालघर जिल्हयात जव्हार व मोखाडा तालुक्यात माहे ऑक्टोबर, २०१६ अखेर २२५४६ बालकांपैकी मध्यम कमी वजनाची ८१३४ व तीव्र कमी वजनाची २२२४ असे एकुण १४४१२ कमी वजनाची आढळून आली आहे. त्यामधील २५८ सॅम व १३६६ मॅम असे एकुण १६२४ बालके आढळून आलेली आहेत.

तसेच पालघर जिल्हयातील सर्व अंगणवाडीतील सर्व बालकांचे सर्वेक्षण करुन तीव्र व अतितीव्र कुपोषित मुलांची यादी अद्यावत करण्याचे आदेश मा. जिल्हाधिकारी, पालघर यांचे आदेशान्वये देण्यात आलेले होते.

(४) हे खरे नाही.

वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र नेरळ यांच्या अहवालानुसार ० ते १ वर्ष वयोगटातील ६ अर्भक मृत्यू, १ ते ५ वयोगटातील १ बालकाचा दुर्धर आजाराने मृत्यू आणि जन्मत: २ बालकांचा मृत्यू झाला आहे.

(५) सदर प्रकरणी जिल्हा परिषदेच्या माध्यमातून सॅम व मॅम बालकांसाठी बालरोग तज्ञांमार्फत आरोग्य तपासणी करण्यात आली असून डीपीसी निधीतून ग्राम बाल विकास केंद्र सुरु करण्यात आले आहेत.

-----------------

## बीड जिल्हयातील अर्धवट अवस्थेतील सिंचन प्रकल्पांच्या कामांना निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(८०) * २३६०५ श्री.अमरसिंह पंडित, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्हयात १०१ ते २५० हे. सिंचन क्षमतेचे रुपये २७५०.६८ लाख किंमतीचे ११ जलसंधारण प्रकल्प प्रशासकीय मान्यता व काम सुरु झालेले असतानाही केवळ सुधारित प्रशासकीय मान्यता आणि निधी अभावी पूर्ण होऊ शकले नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ० ते १०१ हेक्टर सिंचन क्षमतेचे १३७ प्रकल्पांची कामे प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बीड सारख्या सतत दुष्काळी जिल्ह्यात अपुऱ्या सिंचन सुविधा असतानाही उक्त सिंचन प्रकल्प प्रलंबित असण्याची कारणे कोणती आहेत, तसेच काही प्रकल्पांच्या कामावर लाखो रुपयांचा खर्च होऊनही ही कामे अपूर्णावस्थेत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, बीड जिल्ह्यातील अर्धवट अवस्थेतील जलसंधारण प्रकल्प पूर्ण करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

११ जलसंधारण प्रकल्प भूसंपादन प्रक्रिया, शेतकऱ्यांचा विरोध व सुधारीत प्रशासकीय मान्यता या कारणामुळे अपूर्ण आहेत.

(२) होय.

१३७ प्रकल्प भूसंपादन प्रक्रिया व कामे प्रगतीत असल्याने अपूर्ण आहेत.

(३) होय.

भूसंपादन प्रक्रिया, शेतकऱ्यांचा विरोध, सुधारीत प्रशासकीय मान्यता व निधी अभावी प्रकल्प अपूर्ण आहेत.

(४) भूसंपादन प्रक्रिया व सुधारीत प्रशासकीय मान्यता प्राप्त करणेची कार्यवाही पूर्ण होताच निधी उपलब्धतेनुसार महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ, औरंगाबाद यांचेकडून प्रकल्प पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

-----------------

## मौजे खंडाळा (ता.आर्णी, जि.यवतमाळ) या ग्रामपंचायतीने ठराव करुन खंडाळा ते आर्णी मधील नाल्यावर पुल बांधण्याबाबत

**(८१) * २५०७७ श्री.ख्वाजा बेग, श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे खंडाळा (ता.आर्णी, जि.यवतमाळ) या ग्रामपंचायतीने ठराव करुन खंडाळा ते आर्णी मधील नाल्यावर पुल बांधण्याची मागणी मा.मुख्यमंत्री यांचेकडे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) लोणी खंडाळा जवळा गवणा काकडदरा नवनगर हेटी (धनसिंग) उमरी इजारा या इतर जिल्हा मार्ग ६६ या रस्त्याची लांबी १८.०० कि.मी. असून या रस्त्यावर ३ पुलांची बांधकामे नव्याने करण्याकरीता रुपये १०० लक्ष व तात्पुरती दुरुस्ती करण्याकरीता रुपये ६.०० लक्ष असे एकूण रुपये १०६.०० लक्ष निधी आवश्यक आहे.

क्षतिग्रस्त पुलांची तात्पुरती दुरुस्ती करणेबाबत जिल्हा परिषदांना सूचना देण्यात आलेल्या आहेत.

निधीच्या उपलब्धतेनुसार व शासन निकषानुसार प्रश्नांकित पुलाचे काम हाती घेण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.

सद्यस्थितीत पुलावरील वाहतुक वर्दळ सुरळीत सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------------

**राज्यातील जलविद्युत प्रकल्पाच्या दुरूस्तीची कामे पूर्ण करण्याबाबत**

**(८२) * २३५५३ श्री.जयंत पाटील, श्री.जगन्नाथ शिंदे, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.हेमंत टकले, श्री.धनंजय मुंडे, श्री.आनंद ठाकूर, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाच्या अखत्यारीमधील राज्यातील ४६५ मेगावॅट वीजनिर्मिती क्षमतेच्या कोयना तिसरा टप्पा, वीर, भाटघर, कोयना डॅम, वैतरणा व येलदरी हे ६ जलविद्युत प्रकल्प जुने झाले असून त्यांची दुरूस्ती झालेली नसल्यामुळे सदरहू प्रकल्पाची वीजनिर्मिती कोणत्याही क्षणी बंद पडण्याची स्थिती निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाच्या मालकीचे ३ हजार ६०० मेगावॅट वीजनिर्मिती क्षमतेचे २६ जलविद्युत प्रकल्प असून उपरोक्त ६ प्रकल्पाचे आयुर्मान ४० पेक्षा जास्त झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जलविद्युत प्रकल्पाचे आयुर्मान ३५ वर्षे झाल्यानंतर तेथील वीजनिर्मिती बंद करून त्याची विनाविलंब दुरूस्ती करणे आवश्यक असतानाही उपरोक्त ६ प्रकल्पाच्या दुरूस्तीचे काम हाती घेण्यात आलेले नाही, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू ६ जलविद्युत निर्मिती प्रकल्पाच्या दुरुस्तीचे काम पूर्ण करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) हे अंशत: खरे आहे.

कोयना तिसरा टप्पा जलविद्युत प्रकल्पास ४१ वर्षे, वीर जलविद्युत प्रकल्पास ४१ वर्षे, भाटघर जलविद्युत प्रकल्पास ३९ वर्षे, कोयना धरण पायथा जलविद्युत प्रकल्पास ३६ वर्षे, वैतरणा जलविद्युत प्रकल्पास ४० वर्षे व येलदरी जलविद्युत प्रकल्पास ४८ वर्षे पूर्ण झाली आहेत. तथापी या प्रकल्पावरील विद्युत निर्मिती कोणत्याही क्षणी बंद पडेल अशी स्थिती निर्माण झालेली नाही. आवश्यकतेनुसार या प्रकल्पातून वीज निर्मिती चालू आहे.

(२) होय, हे अंशत: खरे आहे.

(३) अंशत: खरे आहे.

(४) शासनास वरीलपैकी वीर, भाटघर व कोयना स्तर-३ या प्रकल्पांचे नुतनीकरण व आधुनिकीकरण कामाचे सविस्तर प्रकल्प अहवाल तयार झालेले आहेत. तसेच येलदरी, कोयना धरण पायथा व वैतरणा या जलविद्युत प्रकल्पांचे नुतनीकरण व आधुनिकीकरण कामाचे सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम क्षेत्रीय स्तरावर सुरु आहे. या प्रकल्पांच्या नुतनीकरणाच्या अंदाजपत्रकास शासनाकडून प्रशासकीय मान्यता प्रदान झाल्यानंतर निधीच्या उपलब्धतेनुसार कामे हाती घेण्यात येतील.

सध्या या प्रकल्पावरील विद्युत निर्मिती ऊर्जा विभागाकडून होते. त्यांच्या नुतनीकरणाचे काम हे विद्युत निर्मिती चालू ठेवून करावी लागणार असल्याने ते ऊर्जा विभागाच्या निधीतून करावे असा निर्णय मा.मंत्री (जलसंपदा) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २/२/२०१६ रोजीच्या बैठकीत झालेला आहे.

-----------------

## शासनाच्या वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये अवयवदानासाठी समुपदेशकांची स्वतंत्र पदे निर्माण करण्याबाबत

**(८३) * २३६१७ डॉ.अपूर्व हिरे : तारांकित प्रश्न क्रमांक १५६५५ ला दिनांक १५ मार्च, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अवयवदान चळवळ रुजविण्याच्या अनुषंगाने जनजागृती व जनतेला अवयवदानाकरिता प्रवृत्त करण्यासाठी आवश्यक असलेली समुपदेशकांची पदे शासनाच्या वैद्यकीय महाविद्यालयात व अन्य स्तरावरूनही निर्माण करण्याची क्रिया पुर्ण झाली आहे काय,

(२) असल्यास, सदरहु पदे निर्माण करण्यात येवून समुपदेशकांच्या प्रत्यक्ष कामकाजास प्रारंभ झालेला आहे काय व त्या कामकाजाची सर्वसाधारण रुपरेषा काय आहे,

(३) असल्यास, अवयवदानाचे नितांत महत्व लक्षात घेता सत्वर पदे निर्माण करणे आणि व्यापक स्वरुपात समुपदेशन करणे, ही कार्यवाही केव्हापर्यंत होणे अपेक्षित आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) राज्यात अवयदान चळवळ रुजविण्याच्या अनुषंगाने स्वतंत्र पदे निर्माण करण्याची कोणतीही कार्यवाही शासन स्तरावर सुरु नाही.

परंतु राज्यामध्ये अवयवदानाच्या संदर्भात विभागाच्या अधिनस्त असलेल्या सर्व शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व संलग्नित रुग्णालये, आरोग्य पथके, परिचर्या शिक्षण संस्था अंतर्गत येणारे रुग्ण, रुग्णांचे नातेवाईक व प्रशिक्षणार्थ्यांना अवयवदानाच्या संदर्भात रुग्णालय प्रशासनामार्फत समुपदेशनाचे काम करण्यात येते.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) उपलब्ध पदांच्या सहाय्याने अवयदानाकरीताच्या समुपदेशनाचे काम स्थानिक रुग्णालय प्रशासन, महाविद्यालय व प्रशिक्षण केंद्रामार्फत जनसामान्यांना व रुग्णांना देण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राळेगाव (जि.यवतमाळ) तालुक्यातील जंगलात नरभक्षक वाघाने शेतकरी व वासराचा बळी घेतल्याबाबत

**(८४) * २४६९४ श्री.हरिसिंग राठोड, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर** : सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राळेगाव (जि.यवतमाळ) तालुक्यातील जंगलात एका नरभक्षक वाघाने दोन शेतकऱ्यांचा व एका वासराचा बळी घेतला, यामुळे शेतकरी व शेतमजूरांना शेतात जाणे अवघड झाल्याने येथील रहिवाशांनी नरभक्षक वाघाचा तातडीने बंदोबस्त करावा अशी मागणी वनसंरक्षक विभागाकडे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान केल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर परिसर नरभक्षक वाघाच्या दहशतीत असल्याने या वाघांचा कायमस्वरुपी बंदोबस्त करण्याबाबत तसेच या वाघांच्या हल्ल्यात मृत्यू पावलेल्यांच्या कुटूंबियांना आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) होय. हे खरे आहे.

श्री. मारोती विठोबा नागोसे, रा. खैरगांव ता. राळेगाव यांचा दिनांक ०३/०९/२०१६ रोजी, दिनांक ०४/०९/२०१६ रोजी श्री. सखाराम लक्ष्मण टेकाम रा. झोटींगदरा, ता. राळेगांव यांचा व दिनांक ०४/०९/२०१६ रोजी एका कालवडीचा वाघाच्या हल्ल्यात मृत्यू झाला आहे, हे खरे आहे.

त्या अनुषंगाने वाघाचा तातडीने बंदोबस्त करण्याबाबत स्थानिक रहिवाशांनी पांढरकवडा वनविभागाकडे अर्जाद्वारे मागणी केली आहे.
(२) प्रस्तुत प्रकरणी प्रचलित शासन निर्णयान्वये मृत व्यक्तीच्या कायदेशीर वारसास प्रत्येकी रुपये ८.०० लक्ष व पशुधन हानी प्रकरणी कालवडीच्या मालकास रुपये ८,०००/- अर्थ सहाय्य अदा करण्यात आले आहे. वाघाचा कायमस्वरुपी बंदोबस्त करण्याच्या स्वरुपाने सदर वाघास जेरबंद करण्याबाबत परवानगी देण्यात आली आहे. तसेच यवतमाळ व मोहदा परिक्षेत्रात गस्त घालण्यात येत आहे. सदर क्षेत्रात ठिकठिकाणी ट्रॅप कॅमेरे लावून वाघाचा शोध घेऊन जेरबंद करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**प्राथमिक आरोग्य केंद्र, भारम तसेच उपकेंद्र खिर्डीसाठे आणि भुलेगाव (ता.येवला, जि.नाशिक) या आरोग्य संस्था सुरु करण्याबाबत**

**(८५) * २३७३६ श्री.जयवंतराव जाधव :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) प्राथमिक आरोग्य केंद्र, भारम तसेच उपकेंद्र खिर्डीसाठे आणि भुलेगाव (ता.येवला, जि.नाशिक) या आरोग्य संस्थांकरिता माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये सुसज्ज इमारती तयार होऊनही दिनांक २३ ऑक्टोबर, २०१६ पर्यंत या आरोग्य संस्था सुरु करण्यात आलेल्या नाहीत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने आरोग्य संस्था सुरु करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे आहे.

(२) सदर आरोग्य संस्थासाठी पदनिर्मिती करण्याबाबत शासनस्तरावर कार्यवाही सुरु असून ती अंतिम टप्प्यात आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**धुळे जिल्ह्यातील अक्कलपाडा धरणातून पाणी सोडण्याबाबत**

**(८६) * २३९३६ ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे जिल्ह्यातील अनेक गावात पाण्याची भीषण परिस्थिती असल्याने अक्कलपाडा धरणातील पाणी सोडण्यात यावे अशी मागणी शेतकऱ्यांनी वारंवार केल्यामुळे अक्कलपाडा धरणातील पाणी लवकर सोडण्यात येईल, असे आश्वासन जिल्हा प्रशासनाने माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान गावकऱ्यांना दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिलेल्या आश्वासनानुसार, एक महिन्यापेक्षा अधिक कालावधी होऊनही अक्कलपाडा धरणातील पाणी सोडण्यात न आल्यामुळे त्या परिसरातील मौजे खंडलाय, शिरडाणे, नवलाने, कावठी, मेहरगाव, निमडाळे, मोंदूर, सूटरेपाडा आदी १० गावातील ग्रामस्थ शेतकऱ्यांनी दिनांक २० सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास जिल्हाधिकारी, धुळे कार्यालयासमोर आंदोलन करुन शासनाचे लक्ष वेधले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आंदोलनकर्त्यांशी जिल्हाधिकाऱ्यांसह कोणत्याही अधिकाऱ्याने संवाद न साधल्यामुळे, या आंदोलनाला लागलेल्या हिंसक वळणामुळे पोलिसांनी केलेल्या लाठीचार्ज कारवाईत काही आंदोलनकर्त्या महिला जखमी झाल्या असून शंभरहून अधिक आंदोलकांना दिनांक २० सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास ताब्यात घेण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) तसेच त्या परिसरातील गावांना अक्कलपाडा धरणातील पाणी सोडण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय.

(२) होय.

(३) व (४) अंशत: खरे आहे.

दिनांक २०/०९/२०१६ रोजी जिल्हाधिकारी, धुळे कार्यालयासमोर आंदोलन सुरू असताना आंदोलनकर्त्यांचे निवडक प्रतिनिधी यांना बोलावुन जिल्हाधिकारी धुळे यांचे दालनात जिल्हाधिकारी यांचे उपस्थितीत अधिक्षक अभियंता धुळे पाटबंधारे प्रकल्प मंडळ धुळे, कार्यकारी अभियंता धुळे मध्यम प्रकल्प विभाग धुळे व उपविभागीय अधिकारी धुळे यांच्या समवेत चर्चा करण्यात आली होती. सदर चर्चेत झालेला निर्णय आंदोलन कर्त्यांना सांगण्यासाठी अधिकारी जात असतांना आंदोलकांकरवी जिल्हाधिकारी कार्यालयावर दगडफेक करण्यात आली. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी आवश्यक कार्यवाही पोलीस दलाकडुन करण्यात आली. सदर कार्यवाहीत पोलीस विभागाने एकुण ७७ आंदोलनकर्त्यांना ताब्यात घेतले होते. आंदोलकांकडुन झालेल्या दगडफेकीत एकूण २१ पोलीस अधिकारी/ कर्मचारी, जिल्हाधिकारी कार्यालयातील २ कर्मचारी व २ आंदोलनकर्ते जखमी झालेले आहेत.

पोलीस यंत्रणेमार्फत याविषयी तपास सुरू आहे.

(५) दिनांक २९/०९/२०१६ ते दिनांक २६/१०/२०१६ या कालावधीत पाणी सोडण्यात आले आहे.

-----------------

**राज्याच्या विकास कामांसाठी शासनाच्या मालकीच्या वापराविना असलेल्या जमिनींचा लिलाव व तारणातून प्रकल्प उभारण्याच्या प्रस्तावाबाबत**

**(८७) * २३५४३ श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या विकास कामांसाठी शासनाच्या मालकीच्या वापराविना असलेल्या जमिनींचा लिलाव व तारणातून दोन लाख कोटी उभारण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असून यासंदर्भात निर्णय घेण्यासाठी अप्पर मुख्य सचिव, वित्त विभाग यांच्या अध्यक्षतेखाली माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान समिती नेमण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रस्ताव स्वरुप काय आहे व त्यानुसार निधी उपलब्धतेसाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, उपरोक्त समितीची रचना व कार्यकक्षा काय आहे, तसेच समितीचा अहवाल प्राप्त झाल्यास त्याचे स्वरुप काय आहे व त्यावर कोणता निर्णय घेण्यात आला आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) होय.
(२) समितीची स्थापना दि.०३/०९/२०१६ च्या शासन निर्णयान्वये करण्यात आली आहे. समितीचा अहवाल अद्याप अप्राप्त असल्याने निधी उपलब्धतेचा प्रश्न उद्भवत नाही.
(३) समितीची रचना व कार्यकक्षा खालील प्रमाणे आहे.

समितीची रचना-

१) अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग-अध्यक्ष
२) प्रधान सचिव (महसूल), महसूल व वन विभाग-सदस्य
३) प्रधान सचिव-१, नगर विकास विभाग-सदस्य
४) प्रधान सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग-सदस्य
५) प्रधान सचिव, जलसंपदा विभाग-सदस्य
६) सचिव (वने), महसूल व वन विभाग-सदस्य
७) सचिव (ऊर्जा), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग-सदस्य
८) उप सचिव, वित्त विभाग (व्यय-९) -सदस्य सचिव,

समितीची कार्यकक्षा पुढीलप्रमाणे आहे. :-

अ) शासनाला ज्या जमिनीची/जागांची आवश्यकता भासणार नाही अशा वापराशिवाय पडून असणा-या जमिनींची प्रशासकीय विभागनिहाय माहिती गोळा करणे व त्यांची पायाभूत सुविधांच्या विकासाकरिता आर्थिकदृष्ट्या क्षमता तपासून पहाणे.

ब) सदर जमिनींचा आर्थिक विनियोग करण्यासाठी पारदर्शक पध्दतीने योजना तयार करुन त्यांच्या लिलावासंबंधी किंवा सदर जमिनी तारण ठेवून त्यावर पायाभूत सुविधांच्या विकासाकरिता कर्जे मिळविणे किंवा अन्य नाविन्यपूर्ण मार्ग शोधणे.

क) या जमिनीच्या आर्थिक विनियोगाबाबत सल्ला देण्याकरिता नामांकित सल्लागार संस्थाची सूची तयार करणे.

ड) या जमिनीच्या आर्थिक विनियोगासंदर्भात टप्पे ठरविणे.

समितीचा अहवाल अद्यापि अप्राप्त असल्याने निर्णय घेण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**नागपूर.**

**उत्तमसिंग चव्हाण**
**सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.